। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २१७ वा । सोमवार दिनांक १० नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक : कायदा व सुव्यवस्थेबाबत बैठक

# निवडणूक काळात प्रतिबंधात्मक आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करा -जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार



धाराशिव,दि.८ नोव्हेंबर (जिमाका) राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५ कार्यक्रम जाहीर केला आहे.नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रात ४ नोव्हेंबरपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक काळात विविध प्रतिबंधात्मक आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

८ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृह नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने आयोजित कायदा व सुव्यवस्थेबाबतच्या बैठकीत श्री.पूजार बोलत होते.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक रितू खोखर,सहाय्यक जिल्हाधिकारी रवैयाह डोंगरे व नगरपालिका प्रशासनचे सहायक आयुक्त श्री.ढेंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री पूजार पुढे म्हणाले की,निवडणूक काळात परवाना असलेली शस्त्रे जमा करून घ्यावी.निवडणूक काळात आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.सुरक्षाविषयक बाबींचा आढावा नियमित घेण्यात यावा.मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसराची आखणी करण्यात यावी.या परिसरात आवश्यक तो प्रतिबंध करण्यात यावा.मतदान केंद्राच्या २०० मीटर बाहेर उमेदवारांचे बुथ असले पाहिजे,याची दक्षता घ्यावी.संयुक्त भेटी देऊन कुठेही उणीव राहणार नाही याबाबत जबाबदारी घ्यावी .मतपेट्या ज्या ठिकाणी ठेवण्यात येणार आहे,त्या स्ट्राँग रूमला व परिसरात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा.तसेच सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे.मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रावर कोणाला प्रवेश राहणार आहे,याची माहिती स्थानिक पातळीवर द्यावी.त्यामुळे संभ्रम राहणार नाही असे ते म्हणाले.

श्रीमती खोखर म्हणाल्या,निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था उत्तम राहावी.निवडणुकीच्या संदर्भाने तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी.दारू व पैशाचा वापर या काळात होणार नाही, याची दक्षता घ्यावी.गावठी पिस्तूल व तलवारीचा निवडणूक काळात कोणाकडूनही वापर होणार नाही, यासाठी धाडसत्र राबवून ते जप्ती कारवाई करण्यात यावी. निवडणुकीसाठी लागणाऱ्या पोलीस बंदोबस्तासाठी आवश्यक पोलीस मनुष्यबळाची मागणी करावी.सर्व पोलीस स्टेशनमध्ये आवश्यक ते शस्त्रास्त्रे व साहित्य उपलब्ध करून घ्यावे,ही निवडणूक निर्भय व शांत वातावरणात पार पाडावी,असे त्या म्हणाल्या.

या बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार,नगरपरिषदा व नगरपंचायतचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

यावेळी संबधित अधिकाऱ्यांनी निवडणूकीच्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या कामांची माहिती दिली.

## वंदे मातरम् गीताच्या १५० वर्षानिमित्त वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन
## वंदे मातरम् आणि भारत माता की जयच्या घोषणांनी परिसर दुमदुमला





धाराशिव (जिमाका) वंदे मातरम या गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धाराशिवच्या वतीने आज ७ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुल धाराशिव येथे वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन करण्यात आले.या सामूहिक गीत गायनात शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था धाराशिव आणि शहरातील विविध शाळा ीं महाविद्यालयातील ३००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शक म्हणून ॲड.रवींद्र कदम यांची उपस्थिती होती.यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शिंदे,जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षणाधिकारी प्रवीण अवताडे, प्रसिद्ध उद्योजक संजय देशमाने, साहित्यिक युवराज नळे,धाराशीव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.नलावडे, उपशिक्षणाधिकारी श्री.होळकर, प्रशासकीय अधिकारी मल्हारी माने व गटशिक्षणाधिकारी अबरार शेख यांची उपस्थिती होती.

या सामहिक गीत गायन कार्यक्रमामध्ये श्रीपतराव भोसले हायस्कूल,शरद पवार हायस्कूल, पोदार इंटरनॅशनल स्कूल,भारत विद्यालय,सत्यभाभा विद्यालय,जिल्हा परिषद कन्या प्रशाला,तेरणा इंजिनिअरींग कॉलेज,आर.पी कॉलेज,शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय,ग्रीनलॅन्ड हायस्कूल,विद्यामाता हायस्कूल, भगीरथीबाई लाटे विद्यालय यासह अन्य शाळा व महाविद्यालये सहभागी झाले.

श्रीपतराव भोसले विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लघु नाटिका सादर केली. अनुजा जाधव या विद्यार्थिनीने वंदे मातरम गीताचे महत्त्व पटवून दिले.शाळा व महाविद्यालये या सामूहिक गीत गायनात सहभागी झाल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यार्थ्यांनी वंदे मातरम आणि भारत माता की जय या दिलेल्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

प्रारंभी मान्यवराच्या हस्ते भारत माता आणि वंदे मातरम गीत लिहिणारे बंकीमचंद्र चटटोपाध्याय यांच्या प्रतिमाचे पूजन व पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.प्रवीण अवताडे यांनी केले.संचालन व उपस्थितांचे आभार शिवाजी चव्हाण यांनी मानले.

कार्यक्रमाला विविध शाळा व महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य,शिक्षकवर्ग तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य व शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.यशस्वीतेसाठी भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मारुती बिरादार व शिक्षक वृदांनी परिश्रम घेतले.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक निवडणुका स्वबळावर लढवणार – के. व्ही.गायकवाड



धाराशिव -( प्रतिनिधी ७) - केंद्र आणि राज्य सरकारच्या अपयशी धोरणामुळे सर्वत्र बेरोजगारी आणि महागाई वाढली आहे. त्यामुळे शेतकरी, कामगार आणि जनता त्रस्त झाली आहे. आर.पी.आय डेमोक्रॅटिक गटाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पक्षाचा विस्तार मोठ्या प्रमाणात केला आहे. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक गटाचे प्रभारी महाराष्ट्र अध्यक्ष के. व्ही.गायकवाड यांनी दिलीफ धाराशिव शहरातील मेघ मल्हार हॉल येथे शुक्रवार ७ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक गटाचे महाराष्ट्राचे प्रभारी अध्यक्ष के. व्ही गायकवाड, छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाध्यक्ष सचिन गंगावणे, छत्रपती संभाजी नगरचे जिल्हा सरचिटणीस विशाल नावकर, अनिल साळवे, संभाजी नगरचे शहराध्यक्ष महेश रगडे, तसेच राजाभाऊ राऊत, जिल्हाध्यक्ष राज धज उपस्थित होते.

पुढे बोलताना गायकवाड म्हणाले की, धाराशिव शहरामध्ये पदाधिकारी यांनी शहरातील विविध समस्या विषयी आंदोलने मागण्या करून समस्या सोडवल्या आहेत. धाराशिव जिल्ह्यामध्ये सत्ताधारी आणि विरोधक एकमेकावर प्रत्यारोप करण्यामध्ये मग्न आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील विविध विकास कामांना स्थगिती मिळाली आहे.

जिल्हाध्यक्ष राज धज मार्गदर्शन करताना म्हणाले की धाराशिव जिल्ह्यातील सर्व गट ,गण आणि प्रभागांमध्ये पक्षाच्या वतीने बैठका घेण्यात आले आहेत. सर्व इच्छुक उमेदवार निवडणुक संपूर्ण ताकदीने लढवणार आहेत. पक्षाच्या वतीने सर्व धर्मीय उमेदवारांना उमेदवारी देण्यात येणार असल्याचेही धज यांनी सांगितले. या बैठकीस युवक जिल्हाध्यक्ष अनिल वाघमारे बांधकाम विभाग जिल्हाध्यक्ष संतोष धावारे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष हाफिज धालुज यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ७१० अंब्याची झाडे उपटुन तोडुन केले नुकसान

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रशांत प्रभाकर मुळे, वय २८ वर्षे, रा. सलगरा दि. ता.तुळजापूर जि. धाराशिव यांचे सलगरा दि शिवारातील शेत गट नं ११४ मधील ७१० अंब्याची झाडे एकुण १,०६,५०० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने दि.०६.११.२०२५ रोजी २०.०० वा. सु.ते दि. ०७.११.२०२५ रोजी ०७.३० वा. सु. उपटुन तोडुन फिर्यादी यांचे नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रशांत मुळे यांनी दि.०७.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे नळदुर्ग येथे भा.न्या.सं.कलम ३२९(३), ३२४ (५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)-आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत उज्वला रा.रमाई नगर धाराशिव ता. जि. धाराशिव या दि.०७.११.२०२५ रोजी रमाई नगर एम आय डी सी धाराशिव येथे अंदाजे १,५५० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे. तसेच कळंब पोलीस ठाणे अंतर्गत अमोल रा. पुर्नवसन सावरगाव कळंब ता.कळंब जि. धाराशिव हे दि.०७.११.२०२५ रोजी पुर्नवसन सावरगाव परळी बायपास रोड कळंब येथे अंदाजे १६,००० किंमतीची २०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## डॉ.प्रतापसिंह पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष निवडी बद्दल सत्कार



धाराशिव -(प्रतिनिधी) पार्टीच्या (शरद पवार) - राष्ट्रवादी काँग्रेस धाराशिव जिल्हाध्यक्षपदी डॉ.प्रतापसिंह पाटील यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर यांनी शनिवार ८ नोव्हेंबर रोजीत्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि पुस्तके देऊन सत्कार केला.

डॉ. शहापूरकर म्हणाल्या की, डॉ. प्रतापसिंह पाटील यांची जिल्हाध्यक्ष म्हणून सार्थ निवड झाली आहे.ही निवड समविचारी पक्षांना बळकट करणारी आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची संघटना अधिक मजबूत होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

## क्राईम न्युज

### सोन्याची व रोख रक्कमेची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे फिर्यादी नामे-परमेश्वर बसवणप्पा जवळगे, वय ५१ वर्षे, रा. कदेर ता. उमरगा जि. धाराशिव हे त्यांचे जुन्या घराला कुलूप लावून नविन घरी गेले असता अज्ञात व्यक्तीने घराचे दाराची कडी दि.०५.११.२०२५ रोजी कापून आत प्रवेश करुन घरातील ३० ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख रक्कम ३०,००० एकुण १,३६,३०३ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- परमेश्वर जवळगे यांनी दि.०७.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४), ३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत श्याम वय ३० वर्षे, रा. जवळा खुर्द, ता. कळंब जि. धाराशिव,राजभाउ रा. शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव हे दि.०७.११.२०२५ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे मोटरसायकल व मोटरसायकल या कळंब ते ढोकी जाणारे रोडवर हॉटेल पुजा बार समोर हायगयी व निष्काळजीपणे रोडवर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द शिराढोण पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

### मोटारसायकलवरुन पडून एका महिलेचा मृत्यू

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दिपक , व सोबत त्यांचे वडील सोमनाथ व आई मयत नामे-मंगल वय ५५ वर्षे, तिघे रा.दांडेगाव ता. भुम जि. धाराशिव हे तिघे दि.१०.०९.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान दांडेगाव ते खर्डा रोडवर नळी फाट्याजवळ दिपक यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून मोटरसायकलवर पाठीमागे बसलेल्या मंगल या मोटरसायकलवरुन खाली पडून गंभीर जखमी होवून उपचार दरम्यान मयत झाल्या. बार्शी शहर पोलीस ठाणे येथुन एमएलसी प्राप्त झाल्यावरुन पोस्टे आंबी येथे अमृ २४/२०२५ चौकशीवरुन फिर्यादी नामे-संध्या आण्णा साहेब भोसले नेमणुक पोलीस ठाणे अंबी यांनी दि.०७.११.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम २८१, १०६(१), १२५ (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क' वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०७ नोव्हेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २२३ कारवाया करुन १,७८,९०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## विरोधकांनी निवडणुकीस समोरे जावे....

राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर महाराष्ट्रात राजकीय घडामोडींना वेग आला. खरे तर राज्यात सध्या सत्तेवर असलेली महायुती आणि विरोधी बाकावर बसलेली महाविकास आघाडी यांच्यात या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये सुद्धा समोरासमोर लढत होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात अशा प्रकारचे चित्र समोर न येता वेगळीच; पण सोयीची काही समीकरणे समोर येण्याचे संकेत दिसत आहेत. निवडणूक आयोगाचा निषेध करण्यासाठी नुकताच मुंबईत काढण्यात आलेल्या 'सत्याचा मोर्चा' या आंदोलनाच्या निमित्ताने महाविकास आघाडी आणि मनसे एकत्र दिसले, पण मनसेला महाविकास आघाडीमध्ये घेण्यास काँग्रेसचा विरोध आहे हे त्यांनी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. मुंबई टिळक भवन येथे झालेल्या काँग्रेस नेत्यांच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेपासून दूर राहण्याचा निर्णय काँग्रेस नेत्यांनी घेतला आहे. म्हणजेच आगामी निवडणुकांमध्ये मनसेबरोबर युती करण्यासाठी काँग्रेस अनुकूल आणि उत्सुक नाही हाच त्याचा अर्थ. महाविकास आघाडीला तिसऱ्या भिडूची गरज नाही अशा प्रकारचे विधान मध्यंतरी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही केले होते आणि मुंबई प्रदेशाध्यक्ष भाई जगताप यांनीसुद्धा राज ठाकरे यांना बरोबर येण्यास विरोध केला होता. याचाच अर्थ राज्यात विरोधी महाविकास आघाडीचे समीकरण बिघडून जाणार आहे. कारण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र लढणार हे जवळजवळ निश्चित समजले जात आहे आणि उद्धव ठाकरे यांनी जर राज ठाकरे यांना साथ देण्याचा आपला निर्णय कायम ठेवला तर काँग्रेस आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस हे इतर घटक पक्ष ठाकरे यांच्यासोबत राहतील असे दिसत नाही. साहजिकच या निवडणुकीच्या निमित्ताने किंवा नंतर होणाऱ्या महापालिका निवडणुकीच्या निमित्तानेसुद्धा ही वेगळी समीकरणे आकाराला येताना दिसत आहेत. दुसरीकडे मराठवाड्याच्या दौरा केलेले उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना सोडून कोणाशीही युती करा, असा आदेश आपल्या कार्यकर्त्यांना दिला आहे. तर शरद पवार यांनी भाजप सोडून इतर कोणत्याही पक्षाशी युती करायला अनुकूलता दर्शवली आहे. या प्रकारचे चित्र आकाराला येत असतानाच महायुती अंतर्गतसुद्धा विविध उपसमीकरणे सोयीच्या माध्यमातून आकाराला येताना दिसत आहेत. जरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका किंवा नंतरच्या महापालिका निवडणुका महायुतीने एकत्रपणे लढाव्यात याबाबत तात्विक निर्णय झाला असला, तरी स्थानिक पातळीवर पूर्वीपासून एकमेकांच्या समोर लढणारे जे राजकीय नेते आहेत त्यांचे या निवडणुकीच्या निमित्ताने मनोमिलन होईल असे सध्या तरी दिसत नाही. कारण ज्या प्रकारे ठाण्याची जबाबदारी भाजपाने गणेश शिंदे यांच्याकडे दिली आहे ते पाहता ठाण्यामध्ये एकनाथ शिंदे यांना आव्हान उभे करण्याचा भाजपाचा मनसुबा आहे.रायगड जिल्ह्यामध्ये सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील तटकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते यांच्यामध्ये वादविवाद कायम आहेत. अजून तेथील पालकमंत्री पदाचा प्रश्नही सुटलेला नाही. साहजिकच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये सुद्धा तेथे महायुतीच्या घटक पक्षांमध्ये किंवा त्यांच्या नेत्यांमध्ये मनोमिलन होण्याची शक्यता दिसत नाही. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये भाजपामध्ये इतर पक्षांमधून मोठ्या प्रमाणावर इनकमिंग झाले असल्याने आज स्थानिक पातळीवरील समीकरणेही बदलून गेली आहेत. पूर्वी एकमेकांच्या विरोधात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवलेले हे नेते आता खांद्याला खांदा लावून एकत्रपणे निवडणूक लढतील का, हा एक प्रश्नही या निमित्ताने समोरे य ेत आहे. सर्वसाधारणपणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तेथील स्थानिक परिस्थितीवरच अवलंबून असतात आणि बहुतेक प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी तेथील स्थानिक नेत्यांना याबाबत निर्णय घेण्याचे अधिकारही दिले आहे. जर महायुती अंतर्गत किंवा महाविकास आघाडी अंतर्गत युती झाली नाही तर मैत्रीपूर्ण लढतीही करण्यास सर्व पक्ष तयार आहेत. साहजिकच आगामी कालावधीमध्ये काही 'सोयीची समीकरणे' तयार होतील किवा काही अपरिहार्यपणे आणि दुसरा पर्याय नसल्याने नवीन राजकीय समीकरणे आकाराला येतील अशी चिन्हे दिसत आहेत. पूर्वी एकमेकांच्या विरोधात लढणारे घटक पक्षच आता महायुती किंवा महाविकास आघाडीच्या निमित्ताने एका झेंड्याखाली एकत्र आल्याने पूर्ववींच राजकीय संघर्ष अनेकांना विसरणे अवघड जाणार आहे. त्यातूनच या निवडणुकीमध्ये काही वेगळी समीकरणे येण्याची शक्यता आहे. काही राजकीय तडजोडी होताना दिसतील. ठाकरे बंधूनी एकत्र येणे तत्त्वतः मान्य केले असल्याने निवडणुकीपुरता तरी उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडीपासून दूर जाण्याचा निर्णय घ्यावा लागेल असेही दिसते. जी काही नवीन समीकरणे आकाराला येतील त्यामध्ये मूलभूत पाया राजकीय सोय हाच असणार आहे. राजकीय सोय आणि राजकीय अपरिहार्यता विचारात घेऊनच गणित मांडून नवे मित्र जोडले जातील आणि जुन्या मित्रांना घटस्फोट दिला जाईल. राजकारणात सारे काही क्षम्य असते ही म्हण सिद्ध करणाऱ्या अनेक घडामोडी आगामी कालावधीमध्ये घडताना दिसल्या तर आश्चर्य वाटायला नको. सध्याला स्वबळावर निवडणुक लढण्याची खुमखमी सर्वांनाच दिसून येत आहे. सुरवातीस स्वबळावर लढतील तर निवडणुक निकालानंतर ते पुन्हा एकत्र येतील. पुर्वी असेच झाले असल्याने त्याची पुर्नरावर्ती होण्याची शक्यता आहे. राज्यात एक असणारे पक्ष दोन झाले. जसे शिवसेना व राष्ट्रवादी विभागली गेली आहे. दोन गट पडले तरी ते सत्तेत आहे. काँग्रेसला आगामी काळात चांगले दिवस येवू शकतात. उद्धव ठाकरे व शरद पवार यांना मात्र बरीच मेहनत घ्यावी लागणार आहे. त्यामुळे तसे पाहिले तर सध्याल प्रत्येक पक्षाला स्वबळावर लढावे असे वाटत असले तरी ते पुन्हा युती व आघाडीत सामिल होणार यात शंका नाही. विरोधक आता निवडणुक जाहिर होताच मोर्चा होणे काढण्यापेक्षा समोरे जाणे योग्य ठरणारे आहे.

### वंदे मातरम् अजरामर गीताचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी प्रवास

# जिथे भारतीय हृदय स्पंदते, तिथे 'वंदे मातरम्'चा स्वर अमर राहणार!

"अनेक पिढ्यांच्या हृदयात उरात धगधगणारी ज्योत वंदे मातरम्." वंदे मातरम् हे केवळ दोन शब्दांचे उच्चारण नाही, तर ते कोट्यवधी भारतीयांच्या राष्ट्रभावनेचा महामंत्र आहे. जिथे भारतीय, तिथे गर्जेल वंदे मातरम् ! जिथे देशभक्ती आहे, तिथे वंदे मातरम्! जिथे जन्मल्या मातीवर प्रेम आहे, तिथे वंदे मातरम्! आणि म्हणूनच वंदे मातरम् भारतीयाच्या हृदयाची स्पंदने जपणारा खऱ्या अर्थाने अजरामर स्तवन आहे.

१८७० च्या दशकात एका प्रखर देशभक्ताच्या लेखणीतून मंतरलेला हा स्फूर्तिदायक स्वर आज १५० वर्षांहून अधिक काळानंतरही तितक्याच उत्साहाने आणि आदराने गायला जातो. भारतीय स्वातंत्र्यलढ्याची स्पंदनं या गीतातून इतकी प्रकर्षाने उमटली की, ते भारताच्या आत्म्याचा आवाज बनले. बंकिमचंद्र चटर्जी यांच्या लेखणीतून झालेला हा विद्युत्स्पर्श, आजच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षात, भारतमातेच्या प्रत्येक पुत्राला तिच्याप्रती नतमस्तक होण्यास भाग पाडतो. एका कवितेने एका राष्ट्राच्या भावनेला कसे प्रेरित केले, याचा हा एक गौरवशाली प्रवास आहे.

कवीच्या अंतःकरणातील क्रांती

सन १८७० चा तो काळ बंगालमध्ये इंग्रजांचे कुटिल कारस्थान आणि जुलमी राजवट भारतीयांना गुलामगिरीचे वेदनास्पर्श देत होती. इंग्रजांनी 'गॉड सेव्ह दी क्वीन' हे त्यांचे राष्ट्रगीत भारतात रुजवून, भारतीयांमध्ये हीनत्वाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. याच प्रयत्नामुळे बंकिमचंद्र चटर्जी यांचे देशभक्त अंतःकरण संतप्त झाले. या देशाला स्वतःचा आवाज हवा! या ध्येयाने प्रेरित होऊन, त्यांनी ७ नोव्हेंबर १८७५ रोजी कलकत्त्याजवळील नैहाटी कांटालपाडा या आपल्या जन्मगावी 'वंदे मातरम्' या अजरामर गीताची रचना केली.

दुर्गेच्या रूपातील भारतमाता:

बंकिमचंद्रांना या भूमीवर होणारा अन्याय आणि तिचे नैसर्गिक सौंदर्य या दोन्ही गोष्टींची जाणीव होती. त्यांच्या दृष्टीने भारतमाता केवळ एक भूभाग नव्हती, तर ती एक सजीव, तेजस्वी देवता होती. आपल्या आनंदमठ (१८८२) या कादंबरीतून त्यांनी याच देवतेचे वर्णन केले. बंकिमचंद्रांनी देशमातेची तीन रूपे समजावून सांगितली:

शांत-समृद्धीमय (लक्ष्मी): सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम् सस्यश्यामलाम् मातरम्... या पहिल्या चरणात शांत, सुजला आणि सुफला असलेल्या भूमीचे वर्णन आहे, जी लक्ष्मीच्या रूपाने देशाला समृद्धी देते. ज्ञानमय (सरस्वती): तुमि विद्या, तुमि धर्म तुमि हृदि, तुमि मर्म... यात देशाला विद्या आणि ज्ञान देणाऱ्या सरस्वतीच्या स्वरूपाचे वर्णन आहे. शौर्यमय (दुर्गा): त्वम् ही दुर्गा दशप्रहरणधारिणी... इथे मातृभूमीला शौर्य आणि शक्ती देणाऱ्या, शत्रूंचा संहार करणाऱ्या दुर्गेचे रूप दिले आहे. हे गीत म्हणजे त्या भूमीवरील पुत्राचे आपल्या सुजलाम् सुफलाम् मातेप्रती असलेले कर्तव्य आणि शौर्याचे आवाहन होते.

स्वातंत्र चळवळीत - क्रांतीचे रणशिंग

वंदे मातरम्ची खरी ज्योत प्रज्वलित झाली ती १८९६ मध्ये. रवींद्रनाथ टागोर यांनी काँग्रेसच्या कोलकाता अधिवेशनात हे गीत प्रथम गायले आणि संपूर्ण अधिवेशन राष्ट्रभक्तीच्या भावनेने भारावून टाकले. पण या गीताला बीजमंत्राचा दर्जा मिळाला तो १९०५ मध्ये, जेव्हा इंग्रजांनी बंगालचे विभाजन केले (बंग-भंग). या आंदोलनात वंदे मातरम् हे केवळ गीत नव्हते, तर ते क्रांतीचे रणशिंग बनले. हिंदू-मुस्लिम यांसह सर्वांनी एकजुटीने हे गीत गायले, ज्यामुळे इंग्रज सरकार हादरले आणि त्यांना फाळणी रद्द करावी लागली.

क्रांतिकारकांचे प्राणतत्त्व बाळ गंगाधर टिळक, बिपिनचंद्र पाल, आणि श्री अरबिंदो यांसारख्या थोर नेत्यांची या गीतावर अढळ श्रद्धा होती. श्री अरबिंदो यांनी या गीताचे महत्त्व सांगताना म्हटले होते: "हे गीत पवित्र मंत्र आहे."

इंग्रजांनी या गीताला "विद्रोही गाणे" म्हणून घोषित केले आणि सार्वजनिक ठिकाणी ते गाण्यावर बंदी घातली. आनंदमठ कादंबरीवरही बंदी होती. हजारो भारतीयांना, क्रांतिकारकांना केवळ वंदे मातरम्चा जयघोष केल्याबद्दल तुरुंगात टाकण्यात आले. क्रांतीकारक सुखदेव, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांसारख्या वीरांनी इंग्रजांचे अत्याचार सहन करत व वंदे मातरम्चा जयघोष करत फासावर गेले.

राष्ट्रीय ध्वजावरील मुद्रा १९०७ मध्ये मादाम कामा यांनी बर्लिन येथे फडकवलेल्या भारताच्या पहिल्या राष्ट्रीय ध्वजावर मध्यभागी वंदे मातरम् असे ठळकपणे लिहिले होते. लाला लजपतराय यांनी लाहोरहून काढलेल्या पाक्षिकाचे नावही 'वंदे मातरम्' होते. हेच सिद्ध करते की, हे गीत स्वातंत्र्यलढ्याचा बीजमंत्र बनला होता.

संविधान व राष्ट्रीय प्रतीक

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, वंदे मातरम्ला राष्ट्रीय प्रतीकांच्या मालिकेत स्थान देण्यावर चर्चा सुरू झाली. १९३७ मध्ये काँग्रेसने गीताच्या पहिल्या दोन कडव्यांना (जे केवळ मातृभूमीच्या सृष्टिसौंदर्याचे वर्णन करतात) राष्ट्रगीत म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव ठेवला. अखेर, २४ जानेवारी १९५० रोजी, भारतीय संविधान सभेने वंदे मातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले. याप्रसंगी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणाले होते की, "जन गण मन" या राष्ट्रगीताच्या बरोबरीने या गाण्याचा देखील सन्मान केला पाहिजे. सन्मानाचा अवधी: जन गण मन या राष्ट्रगीतासाठी ५२ सेकंद हा कालावधी निश्चित असताना, वंदे मातरम् च्या सादरीकरणासाठी ६५ सेकंदांचा अवधी निश्चित करण्यात आला आहे. हे गीत प्रत्येक भारतीयाच्या ओळखीचा आणि संघर्षाचा अभिमान बनून राहिले, ज्यामुळे त्याला राष्ट्रगीताच्या समकक्ष राष्ट्रीय गीत म्हणून सन्मान मिळाला.

कालांतराने वंदे मातरम् भोवती धार्मिक-राजकीय वादांचे वादळ घोंघावत राहिले. या गीतावर काही विशिष्ट धर्मीयांनी मूर्तीपूजेच्या संदर्भावरून आक्षेप घेतले, ज्यामुळे विभाजन आणि समन्वयाच्या चर्चा झडल्या. काही स्वयंघोषित विद्वानांनी तर बंकिमचंद्रांना द्विराष्ट्रवादाच्या सिद्धान्ताचे जनक ठरविण्याचा प्रयत्न केला. मात्र मूळ आशय: विभाजन नव्हे, समन्वय होता. बंकिमचंद्र चटर्जी यांनी आपल्या सीताराम कादंबरीत एका पात्राच्या तोंडी असे वाक्य दिले आहे, आपण हिंदू-मुस्लिमात भेद केल्यास दोन्ही समुदाय वास्तव्य करत असलेल्या या भूमीवर आपले राज्य सुरक्षित ठेवू शकणार नाहीस. यातून स्पष्ट होते की, बंकिमचंद्रांचा मूळ आशय धार्मिक विभाजन नसून, मातृभूमीप्रती सर्वांचे प्रेम आणि समर्पण हे होते. वंदे मातरम्च्या पहिल्या दोन श्लोकांमध्ये आई आणि मातृभूमीचा अमूर्त संदर्भ आहे. दुर्गा किंवा इतर हिंदू देवींचा उल्लेख नंतरच्या श्लोकांमध्ये येतो. काँग्रेसने १९३७ मध्ये याच कारणास्तव पहिल्या दोन कडव्यांना स्वीकारले. "धर्मावर नाही, मातृभूमीवर प्रेम ही या गीताची आत्मा." वंदे मातरम् हे संस्कृत नसून ती संस्कृती आहे. ही संस्कृती आहे बलिदान, त्याग, समर्पण आणि सर्वस्व पणास लावण्याची.

वंदे मातरम् केवळ राजकीय आंदोलनाचे प्रतीक राहिले नाही, तर ते भारतीय सांस्कृतिक वारशाची अखंड परंपरा बनले. १८८२ मध्ये जदुनाथ भट्टाचार्य यांनी या गीताची चाल बसवली. त्यानंतर विसाव्या शतकात अनेक संगीतकारांनी याला विविध रागांमध्ये बांधले.

आनंद मठ, लीडर, अमर आशा यांसारख्या चित्रपटांमध्ये या गीताचे निरनिराळ्या चालींवर चित्रण झाले. विख्यात संगीतज्ञ पंडित रविशंकर यांनी आकाशवाणीकरिता या गीताची चाल लावून दिली, जी खूप लोकप्रिय झाली. ए. आर. रहमानचा सलाम: १९९७ साली भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात, लोकप्रिय संगीतकार ए. आर. रहमान यांनी 'वंदे मातरम् (माँ तुझे सलाम) हा गीतसंग्रह प्रकाशित केला. या आधुनिक रूपाने ते गीत तरुणाईपर्यंत पोहोचवले. २००२ मध्ये बीबीसी वर्ल्ड सर्व्हिसने केलेल्या सर्वेक्षणात रहमानच्या वंदे मातरम्ला जगात दुसऱ्या क्रमांकाचे स्थान लाभले. आजची पिढी माँ तुझे सलाम पासून ते आजच्या शालेय दैनंदिनीपर्यंत, युगानुयुगे हे गीत राष्ट्रप्रेमाचे स्रोत बनून राहिले आहे.

वंदे मातरम् या अजरामर गीताचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव साजरा करताना, आपण एका ऐतिहासिक आणि भावनिक प्रवासाला उजाळा देत आहोत. हे गीत म्हणजे भारतीय राष्ट्रभावनेचे प्राणतत्त्व आहे. हे एक सजीव मातृस्तवन आहे, जे भारतीयांची ओळख, अभिमान आणि संघर्षाचा जयघोष आहे.

ज्या एका कवितेने इंग्रजांना आपल्याविरोधातच असल्याबाबत यत्किंचितही शंका नव्हती, ज्याने क्रांतिकारकांना फासावर जातानाही शक्ती दिली, आणि ज्याने देशाला एकसंध ठेवले त्या वंदे मातरम्प्रती भारतीयांनी सदैव कृतज्ञ राहिले पाहिजे.

बंकिमचंद्रांनी आपल्या लेखात म्हटले होते, 'कालसमुद्रात अंतर्धान पावलेल्या मातृभूमीच्या त्या सुवर्णमयी प्रतिमेला आपण सर्व मिळून त्या कालसमुद्रात उडी घेऊन बाहेर काढू या.' आज आपण अभिमानाने म्हणू शकतो की, वंदे मातरम्च्या जयघोषाने, तो सुवर्णमुकुट बाहेर काढण्यात आपण यशस्वी झालो आहोत. जिथे जिथे भारतीय हृदय स्पंदते, तिथे तिथे 'वंदे मातरम्'चा स्वर अमर राहणार!

**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**- मो. ९८९०५७७१२८**



# विभागीय मैदानी स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश




**लातूर/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,लातूर आयोजित दि.०४ ते ०५ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.यामध्ये शुभम माशीमोडे याने १०० मी.रनिंग प्रकारात प्रथम क्रमांक मिळविला आणि वीरेश चौधरी याने उंच उडी प्रकारात प्रथम क्रमांक मिळविला तसेच वैष्णवी उरकिडे हिने भालाफेक प्रकारात प्रथम क्रमांक मिळविला तर वैष्णवी माने तीन किलोमीटर धावणे या प्रकारात प्रथम क्रमांक मिळविला.या खेळाडूंना डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा.विनोद गेवरे यांचे मार्गदर्शन लाभले.

सदरील विजयी खेळाडूंचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, प्रा.मनोज पाटील,प्रा.शिवाजी राठोड, प्रा.शैलेश सूर्यवंशी, प्रा.मनीषा बाजपेयी, प्रा.मंजुषा कदम, प्रा.मेघा भिसे, प्रा.कल्पना गव्हाणे, प्रा.चिक्राळे, प्रा.जाधव प्रा.गोपाल अवस्थी, प्रा.व्यंकट कैले, प्रा.भोसले, प्रा.एस.पी.शेळगे, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, इतर शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिन २०२५

राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिनानिमित्त, आयुष मंत्रालयाने जनजागृती आणि लवकर निदान करण्याच्या प्रयत्नांना बळकटी देण्याची गरज अधोरेखित केली आहे कारण कर्करोग हा जागतिक स्तरावर मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण ठरत आहे. जगभरातील अनेक देशांमध्ये तोंडाच्या, गर्भाशयाच्या आणि स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांची मोठ्या प्रमाणावर नोंद झाली आहे. या आव्हानाला अधिक प्रभावीपणे तोंड देण्यासाठी शिक्षण, तपासणी आणि समग्र आरोग्य पद्धतींवर भारत अधिक भर देत आहे.

कर्करोगाच्या वाढता धोका तंबाखूचा वापर, अनारोग्यकारक आहार, लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता, मद्यपान, पर्यावरणीय प्रदूषण आणि एचपीव्ही संसर्ग यासारख्या टाळता येण्याजोग्या घटकांमुळे उद्भवतो, ज्यामुळे अधिक जागरूकता आणि वेळेवर कृती करण्याची आवश्यकता अधोरेखित होते. लवकर निदान झाल्यास जगण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात सुधारते, विशेषतः स्तनाच्या, गर्भाशयाच्या आणि तोंडाच्या कर्करोगांसाठी जे नियमित तपासणीद्वारे अधिक उपचार करण्यायोग्य टप्प्यांवर ओळखले जाऊ शकतात. अनेक कर्करोगापासून बचाव शक्य आहे. जेव्हा बऱ्याच जणांचे लवकर निदान होते तेव्हा उपचार शक्य असतात, म्हणून निरोगी जीवनशैलीची निवड करणे महत्त्वपूर्ण आहे. तंबाखू टाळणे, वनस्पती-आधारित आहार घेणे, वजन आटोक्यात ठेवणे, सक्रिय राहणे आणि धूम्रपान आणि प्रदूषकांच्या संपर्कात येणे टाळल्यास एकत्रितपणे जोखीम कमी करण्यास आणि दीर्घकालीन आरोग्यास समर्थन देण्यास मदत होते.

सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी कर्करोग जागरूकता आणि प्रतिबंधासाठी सक्रिय आणि लोककेंद्रित दृष्टीकोन आवश्यक असल्याचे आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी नमूद केले. एकात्मिक कर्करोग सुश्रुषा केंद्रे, सहयोगी संशोधन प्रयत्न आणि समुदाय-केंद्रित कार्यक्रमांसह मंत्रालयाच्या विस्तारित उपक्रमांचे उद्दीष्ट - प्रत्येक नागरिकाला परवडणारी, योग्य आणि सहाय्यक सेवा मिळण्याची सुनिश्चिती करणे हे आहे . एकात्मिक मॉडेल्समुळे आधुनिक ऑन्कॉलॉजी आणि आयुष प्रणालींची सांगड घातली तर ते विशेषतः समाजातील दुर्बल घटकांच्या जीवनमानाच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा घडवून आणू शकतात असेही त्यांनी निदर्शनास आणले.

आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा म्हणाले की, देशातील एकात्मिक कर्करोग उपचार उपक्रमांचे वाढते जाळे पुरावा-आधारित, रुग्ण-केंद्रित उपाय मजबूत करण्यासाठी मंत्रालयाची वचनबद्धता दर्शवते.

आयुष मंत्रालय एकात्मिक सेवा आणि आयुष औषध संशोधनासाठी मुंबईतील टीएमसी-एक्टरेक सह प्रमुख उत्कृष्टता केंद्रांद्वारे एकात्मिक कर्करोग देखभाल सेवेचा विस्तार करत आहे.

कर्करोगाच्या वाढत्या धोक्यावर मात करण्यासाठी प्रतिबंध, लवकर निदान आणि एकात्मिक सहाय्यक सेवा देशाच्या केंद्रस्थानी असायला हवी, यावर आयुष मंत्रालयाने भर दिला आहे. जागरूकता वाढविणे, स्क्रीनिंगपर्यंत पोहोच सुधारणे आणि जोखीम कमी करण्यासाठी आणि परिणाम सुधारण्यासाठी निरोगी जीवनशैली निवडींना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. हे प्रयत्न आयुष प्रणालीच्या प्रतिबंधात्मक आणि सहाय्यक सामर्थ्यासह आधुनिक वैद्यकीय पद्धतींची सांगड घालण्याच्या दृष्टीकोनाला पूरक आहेत. यामुळे राष्ट्रीय भार कमी करण्यासाठी आणि रुग्ण आणि समुदायाचे कल्याण वाढवण्यासाठी एक चांगला मार्ग प्रदान होईल.

## एंट्री पॉइंट ला सहाय्यक प्राध्यापक भरतीसाठीचे युजीसी ने मान्यता दिलेले ५०:५० चे सूत्र अवलंबावे - अभाविप

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांमधील रखडलेली प्राध्यापक भरती होण्याचे संकेत दिसत आहेत, याचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद स्वागत करीत आहे. गेली दहा-बारा वर्षांपासून विद्यापीठांमधील रखडलेली प्राध्यापक भरती आता होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे असे विविध विद्यापीठांच्या प्राध्यापक भरतीच्या जाहिरातींवरून निदर्शनास येते आहे. याचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद स्वागत करीत आहे. ही भरती पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाने नुकताच एक शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. पदभरती पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने व्हावी या उद्देशाने दिनांक ६ ऑक्टोबरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामधील एका महत्त्वाच्या मुद्यावर मात्र विद्यार्थी परिषद आक्षेप व्यक्त करीत आहे. या परिपत्रकानुसार सहाय्यक प्राध्यापक भरतीच्या संदर्भात ज्या अटी टाकण्यात आल्या आहेत त्या युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वाला अनुसरून नाहीत असे सकृतदर्शनी दिसत आहे.

सहाय्यक प्राध्यापक म्हणून अर्ज करण्यासाठी सेट/नेट परीक्षा उत्तीर्ण अथवा पीएचडी झालेली असावी असे युजीसीची मार्गदर्शक तत्वे सांगतात. या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक पात्रतेसाठी ५० गुण आणि मुलाखतीसाठी ५० गुण असे विभाजन केले आहे आणि असे विभाजन योग्य तसेच सर्व समावेशक ही आहे. परंतु महाराष्ट्र शासनाच्या या शासन निर्णयात मात्र निवड होण्यासाठी सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ७५:२५ हे सूत्र ठेवण्यात आले आहे . या ७५ गुणांमध्ये शैक्षणिक पात्रता, शिकवण्याचा अनुभव आणि संशोधन कार्य या सर्वाला मिळून ७५ गुण ठेवले आहेत आणि या ७५ पैकी किमान ५० गुण जर मिळाले असतील तरच ती व्यक्ती मुलाखतीसाठी पात्र ठरणार आहे. मुळात केवळ सेट/नेट झालेल्या व्यक्तीला शिकवण्याचा अनुभव आणि संशोधन कार्य या संदर्भात गुण कसे मिळणार ? शिवाय या अटींमध्ये एक भेद असा करण्यात आला आहे, की ज्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील महाविद्यालय व विद्यापीठातून आपले पदवी, पदव्युत्तर पदवी आणि एम.फिल./पीएचडी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असेल, त्यांना तुलनेने एका अर्थाने कमी गुण मिळणार आहेत. याचा अर्थ केवळ सेट/नेट अथवा पीएचडी झालेली व्यक्ती आणि शिवाय ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या ७५ पैकी ५० गुणांच्या अटीमध्ये पात्रच ठरू शकणार नाही. म्हणजे महाराष्ट्रातील बहुसंख्य महाविद्यालय व विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना या प्रक्रियेतून डावलले जात आहे. युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अशा व्यक्तींना अर्ज करण्याची मुभा आहे. मात्र या शासन निर्णयानुसार अशा व्यक्तींनी जरी अर्ज केला, तरी ते पात्रच ठरू शकत नाही. एक प्रकारे नवीन सेट नेट अथवा पीएचडी झालेली व्यक्ती सहाय्यक प्राध्यापक पदाच्या नियुक्तीस पात्रच ठरू शकणार नाही, त्यामुळे हा शासन निर्णय त्यांच्यावर अन्याय करणारा आहे.

या शासन निर्णयात सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक या संदर्भात ज्या अटी आहेत त्या ७५:२५ या सूत्रानुसार होण्यास काही आक्षेप असण्याचे कारण नाही. मात्र अनुभवी सहाय्यक प्राध्यापक हे या ७५ पैकी अपेक्षित गुण मिळवू शकतात. त्यामुळे केवळ सुरवातीस म्हणजेच सहाय्यक प्राध्यापक पदाच्या संदर्भातील ७५:२५ ही अट नैसर्गिक न्यायाच्या विरोधात असल्याने त्यावर योग्य पुनर्विचार करून कोणावरही अन्याय होणार नाही अशा पद्धतीने शासन निर्णयात बदल करण्यात यावा अशी ठाम मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद करीत आहे. मुळात गेली अनेक वर्षे रखडलेल्या प्राध्यापक भरतीची कार्यवाही आणि अमलबजावणी लवकरात लवकर व्हावी हीच विद्यार्थी परिषदेची भूमिका आणि मागणी राहिलेली आहे. पण असे होत असताना एन्ट्री पॉइंटला सहाय्यक प्राध्यापक भरतीसाठीचे ७५:२५ चे सूत्र न अवलंबता युजीसीने मान्यता दिलेले ५०:५० चे सूत्र अवलंबावे. तसेच शैक्षणिक पात्रतेतील दुजाभाव करणाऱ्या मानांकन पद्धतीमध्ये बदल करावा, अशी देखील मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद करत आहे.

यावर शासनाने योग्य तो निर्णय घेऊन कोणावरही अन्याय होणार नाही तसेच केवळ या मुद्यावर भरती प्रक्रिया रखडली जाणार नाही अशी अपेक्षा आणि मागणी विद्यार्थी परिषद करीत आहे.

# थंडीत डोळ्यांची काळजी घ्या...

ठाणे : थंडी वाढणार असल्याचे संकेत हवामान खात्याने दिले असून या काळात शरीरासोबतच डोळ्यांचीही विशेष काळजी घेणे अत्यावश्यक आहे, असा सल्ला नेत्रतज्ज्ञांनी दिला आहे. थंड वारे, कोरडी हवा आणि स्क्रीनसमोर वाढलेला वेळ या सगळ्यांचा परिणाम थेट डोळ्यांवर होत असून डोळे कोरडे पडणे, लालसरपणा, चुरचुरणे आणि दृष्टी धूसर होणे या तक्रारी वाढू शकतात.

हिवाळ्याच्या मोसमात अवकाळी पावसाने हजेरी लावली असल्यामुळे थंडी काहीशी लांबली आहे. मात्र थंडीच्या दिवसात डोळ्यांची काळजी तितकीच महत्त्वाची आहे. या काळात हवेतील आर्द्रता कमी होते. त्यामुळे डोळ्यांचा नैसर्गिक ओलावा कमी होतो. यासाठी घरात ह्यूमिडिफायर वापरणे, पुरेसे पाणी पिणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने आर्टिफिशियल टिअर्स (कृत्रिम अश्रू) वापरण्याचा सल्ला दिला जात आहे.



ेरड्या हवेमुळे डोळ्यांचे आरोग्य बिघडू शकते थकवा आणि झोपेअभावी डोळ्यांत कोरडेपणा येतो. दररोज किमान सात ते आठ तासांची झोप घेतल्यास डोळ्यांना विश्रांती मिळते आणि ते ताजेतवाने राहतात. डोळ्यांत खाज, लालसरपणा, पाणी येणे किंवा दृष्टी धूसर होणे या तक्रारी वाढल्यास स्वउपचार न करता नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.'' – डॉ. शुभांगी अंबाडेकर (नेत्रतज्ज्ञ सिव्हिल रुग्णालय ठाणे)काय काळजी घ्याल :बाहेर पडताना डोळ्यांवर थंड वाऱ्याचा आणि धुळीचा थेट परिणाम होतो. त्यामुळे सनग्लासेस किंवा संरक्षणात्मक चष्मा वापरणे आवश्यक आहे. हे डोळ्यांना थंडी, धूळ आणि तीव्र प्रकाशापासून बचाव करत असल्याची माहिती सिव्हिल रुग्णालयाच्या नेत्रतज्ज्ञ डॉ. शुभांगी अंबाडेकर यांनी दिली.

ाजर, पालक, बदाम, अक्रोड आणि ओमेगा–३ फॅटी ॲसिड्स असलेले पदार्थ डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.व्हिटॅमिन ए, सी आणि ई यांचा पुरवठा केल्यास दृष्टीसंबंधी त्रास कमी होऊ शकतो. प्रत्येक २० मिनिटांनी २० सेकंद स्क्रीनपासून दूर पाहण्याचा सल्ला दिला जातो. असे केल्यास डोळ्यांवरील ताण कमी होतो.

# मानवी आरोग्य चांगले राहण्यासाठी

आरोग्य चांगले ठेवण्यासाठी संतुलित आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, पुरेशी झोप घेणे, भरपूर पाणी पिणे आणि तणाव कमी करणे यांसारख्या गोष्टी कराव्यात. याव्यतिरिक्त, स्वच्छता पाळणे, मद्यपान टाळणे आणि नियमित आरोग्य तपासणी करणे देखील महत्त्वाचे आहे.

आहार आणि पाणी

संतुलित आहार घ्या: फळे, भाज्या, प्रथिने आणि पिष्टमय पदार्थ यांचा आहारात समावेश करा.प्रक्रिया केलेले पदार्थ टाळा: जास्त मीठ, साखर आणि चरबी असलेले पदार्थ आणि पेये कमी प्रमाणात खा.

भरपूर पाणी प्या: शरीराला हायड्रेटेड ठेवण्यासाठी दिवसभर पुरेसे पाणी प्या.

जीवनशैली नियमित व्यायाम करा: नियमित व्यायामामुळे शरीर तंदुरुस्त



राहते.पुरेशी झोप घ्या: चांगल्या आरोग्यासाठी पुरेशी आणि शांत झोप घेणे आवश्यक आहे.तणाव कमी करा: तणाव कमी करण्यासाठी मित्र आणि कुटुंबासोबत वेळ घालवा, छंद जोपासा आणि आरामशीर राहण्याचा प्रयत्न करा.

इतर महत्त्वाचे मुद्दे स्वच्छता राखा: वैयक्तिक आणि परिसर स्वच्छता पाळणे आरोग्यासाठी आवश्यक आहे.मद्यपान टाळा: मद्यपानाचे सेवन मर्यादित करा किंवा पूर्णपणे टाळा.

नियमित आरोग्य तपासणी करा: नियमित आरोग्य तपासणी करून तुम्ही कोणत्याही आरोग्य समस्येवर वेळेवर उपचार करू शकता.

# महिला डॉक्टराकडे किधी लक्ष देणार!

'आत्महत्या झाली. आरोपींना अटक झाली. प्रकरण संपले' असेच आणि इतपतच डॉ. संपदा मुंडे यांच्या मृत्यूकडे पाहिले जाईल. वास्तविक हा रोगट व्यवस्थेने घेतलेला बळी...

:त्याबद्दल ज्याचे नाव लिहिले गेले तो उपनिरीक्षक नुकताच बडतर्फ झाला. पण व्यवस्थेला लागलेल्या सरंजामी ग्रहणाचे काय?

एकतर कोणावर अन्याय होऊच नये, झालाच तर त्याची चौकशी निष्पक्षपणे व्हायला हवी. यासाठी व्यवस्थेत पारदर्शीपणा हवा. पण अलीकडे त्याचीच नेमकी बोंब. या पारदर्शकतेच्या अभावामुळे काय उत्पात घडतो हे साखर कारखान्यांनी वेढलेल्या फलटणच्या सरकारी रुग्णालयातील डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणावरून कळावे. परत आजचे वास्तव असे की अशी कोणतीही घटना उघडकीस आली की आरोप–प्रत्यारोपाच्या फैरी झाडत त्यास राजकीय वळण देणे वा त्या माध्यमातून राजकीय वैराचे हिशेब चुकते करणे. याचाही प्रत्यय येथे येतो. ही आत्महत्या घडून काही आठवडे लोटले तरी त्यावरून जे सुरू आहे ते प्रगत म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्रास शोभणारे नाही. यात अधिक दुर्दैव हे की समाजात यावर साधी चर्चाही घडताना दिसत नाही. अर्थात कोठे, कोणास, कोणा जातीच्या व्यक्तीने कोणा जातीच्या व्यक्तीचा बळी घेतला यावर चर्चा होणार की नाही, हे ठरते हे आपले दुसरे वास्तव. या डॉक्टर तरुणीचा गळफास घेतलेला मृतदेह एका हॉटेलात सापडला, तिने तिच्या हातावर तिच्या मृत्यूला जबाबदार कोण हे लिहून ठेवले होते. साहजिकच त्याआधारे तपास सुरू झाला व पोलीस दलातील गोपाळ बदने नावाचा एक अधिकारी अटकेनंतर लगेच निलंबित आणि आता बडतर्फ झाला. मात्र याच डॉक्टरने मृत्यूच्या काही दिवस आधी जे चार पानी पत्र लिहून ठेवले होते, त्यात उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे काय? त्यावर सरकार खरेच गंभीरपणे विचार करणार आहे की नाही? कर्तव्यावर असताना या डॉक्टरकडे पोलीस आरोपींना तपासणीसाठी घेऊन जायचे. त्यांना मारहाण झालेली दिसत असूनही वैद्याकीयदृष्ट्या 'स्वस्थ' असे प्रमाणपत्र देण्याचा आग्रह धरायचे. हे नेमके कोणासाठी केले जात होते? काही बड्या राजकीय धेंडांना वाचवण्यासाठी केले जात होते का? याची उत्तरे शोधायला गेले की व्यवस्थेतले धगधगीत नग्न वास्तव समोर येते.

साखर कारखानदार व त्यांच्यासाठी काम करणारे ऊसतोड कामगार यांच्यातील कटू तसेच भेदभावपूर्ण संबंधांवर प्रकाश टाकणाऱ्या या वास्तवाकडे आपण किती काळ दुर्लक्ष करत राहणार? हे गरीब कामगार प्रामुख्याने मराठवाड्यातील. त्यातही बीड परिसरातील अधिक. त्यातील काहींनी ऊसतोडणीसाठी उचल म्हणून आगाऊ रक्कम घेतली आणि नंतर पलायन केले तर फसवणुकीची तक्रार दाखल करण्याची मुभा कायद्याने सर्वांना आहे. पण आम्ही म्हणू तोच कायदा अशी वृत्ती अंगी ठासून भरलेल्या कारखानदारांस या मार्गाची काय मातबरी? अशा पलायन करणाऱ्या कामगारांना पकडून आणायचे, निर्घृणपणे चोपायचे आणि नंतर त्यांच्याच




विरोधात फसवणुकीची तक्रार दाखल करून त्यास स्वत:च पोलिसांच्या हवाली करायचे ही प्रचलित प्रथा. त्याला दिलेला मार दिसला तर दांडगाईचे बिंग फुटेल म्हणून 'फिटनेस'साठी रुग्णालयावर दबाव आणायचा. ही समांतर व सरंजामशाहीसदृश व्यवस्था पश्चिम महाराष्ट्रात ठिकठिकाणी आहे. तिला पोलीस यंत्रणा कशी शरण गेली आहे हे संपदा मुंडे प्रकरणातून स्पष्ट दिसले. मात्र, तिला विरोध केला की काय होते हे या डॉक्टर तरुणीने अनुभवले, हे तिच्या त्या चार पानी खुलाशातून दिसले. यातून येणाऱ्या दबावाच्या संदर्भात तक्रारी करूनही काहीच होत नसेल, थातूरमातूर चौकशी केली जात असेल तर या डॉक्टरने आशेने बघावे तरी कोणाकडे? अशा स्थितीत जीव देण्याची वेळ तिच्यावर येत असेल तर त्याला नेमके दोषी कोण? सरकार या प्रकरणाचा या अंगाने तपास करायला का कचरते? आणि तो तपास पूर्ण होण्याआधीच आरोप होत असलेल्या कारखानदार कमी राजकीय पुढारी अधिक अशा व्यक्तीस कशाच्या आधारावर 'क्लीनचिट' दिली जाते? सरकारच जर न्यायाधीशाच्या भूमिकेत शिरू लागले तर प्रचलित न्यायव्यवस्थेचे मग काम काय? तपासाआधीच अमुक एक दोषी नाही असे सरकारप्रमुखच जाहीरपणे म्हणत असेल तर तपास अधिकाऱ्यांनी त्याचा नेमका काय अर्थ घ्यायचा? सरकारकडून दाखवली जाणारी ही तत्परता नेमकी कोणाला वाचवण्यासाठी? हे सारे संशय निर्माण करणारे प्रश्न आता उपस्थित होतात. त्यांची उत्तरे मिळत नाहीत म्हणून समाजमनात संताप दिसतो.

राज्यभरातील डॉक्टर संप करतात ते यामुळे. माणूस कितीही मोठा असो, कायदा हातात घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. मात्र अलीकडे राजकीय पाठबळाच्या भरवशावर स्वत:च्या प्रभावक्षेत्राची जहागिरी सांभाळणारे, साखर कारखान्याच्या बळावर काही हजार मते खिशात ठेवून वावरणारे अनेक नेते सत्ताधाऱ्यांच्या आडोशाने सुखात आहेत. आम्ही म्हणू तो कायदा असेच त्यांचे वर्तन. या प्रकरणात आजवर जो तपशील उघड झाला तो हेच दर्शवणारा. ऊसतोड कामगारांचे शोषण ही राज्यासाठी काही नवी बाब नाही. ते थांबावे म्हणून सरकारने अनेक कल्याणकारी योजनांचा घाट घातला. एक मंडळही अस्तित्वात आले. परंतु प्रत्यक्षात शेतात काय घडते याचे दाहक वास्तव सातत्याने समोर येत असते. कामगारांनी उचल घेऊन पळून जाणे हे चूकच, पण अनेकदा गरिबी माणसाला पलयनवाद शिकवते. त्यामुळे कामगारांवर ही वेळ येते का याचा विचार गंभीरपणे करायला आज कोणीही तयार नाही. जीव देणाऱ्या डॉक्टर तरुणीच्या मनात कदाचित हे मुद्दे आलेही नसतील, पण व्यवसायमूल्य राखत तिने येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची योग्य दखल घेतली असेल तर ती तिची चूक असेल?

यात आणखी एक बाजू आहे ती चारित्र्याची. या प्रकरणात या तरुणीच्या हातावर लिहिलेल्या मजकुराच्या आधारे सर्वाधिक चर्चा झाली ती याच मुद्द्याची. हा मजकूर तिनेच लिहिला की आणखी कोणी हे तपासातून स्पष्ट होईल अशी आशा करूच. मात्र यामुळे तिच्या मूळ तक्रारीकडे म्हणजेच अंतर्गत चौकशीच्या काळात दिलेल्या जबाबाकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले. स्त्री आणि चारित्र्य हे एकमेकात गुंफले की खऱ्या कारणापासून दूर पळता येते हेच या प्रकरणात यंत्रणांनी दाखवून दिले. मग तो महिला आयोग असो की तपासयंत्रणा. हा काळ सर्वच संवैधानिक आणि प्रशासनिक संस्थांचे राजकीयीकरण केले जाण्याचा. महिला आयोगही त्याला अपवाद नाही हेच यातून दिसले. ती डॉक्टर तरुणी नेमक्या कोणत्या दबावाखाली कर्तव्य पार पाडत होती? तिचे मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न सतत झाला का? यातून तिचा गैरफायदा घेण्याचा प्रकार घडला असेल का, असे अनेक प्रश्न या प्रकरणात अजूनही अनुत्तरित आहेत. त्याची उत्तरे तपासातून खरोखर मिळतील का हाही सध्या तरी उत्तराच्या प्रतीक्षेत असलेला प्रश्न.

याचे कारण पुन्हा राजकीय लाभाच्या व्याख्येत दडले आहे.

त्यामुळेच सरकारने प्रथमदर्शनी पुराव्याच्या आधारे दिलेली 'क्लीनचिट' तपासानंतर खरी ठरेलही. मात्र व्यवस्थेला लागलेल्या सरंजामी ग्रहणाचे काय? ते कधी सुटणार? बड्यांकडून तळागाळातल्यांचे होणारे शोषण, त्यातून उद्भवणारी अशी प्रकरणे हे रोगग्रस्त समाजाचे लक्षण नाही असे कोण म्हणेल? यावर कोणीही गंभीरपणे विचार करू इच्छित नाही. ही व्यवस्था सडलेली आहे हे सारेच मान्य करतात पण ती दुरुस्त करण्यासाठी पुढाकार घेणार कोण? त्यामुळेच 'आत्महत्या झाली. आरोपींना अटक झाली. प्रकरण संपले' असेच आणि इतपतच या घटनेकडे पाहिले जाईल. उच्चशिक्षित डॉक्टर असलेली व्यक्ती या रोगट व्यवस्थेची आणखी एक बळी ठरली, हा मुद्दा गौण. ज्या व्यवस्थेत डॉक्टरसारखे व्यावसायिकही कधी खड्ड्यात पडून, कधी आत्महत्या करून, तर कधी हत्या होऊन मरतात हे सत्य असते, तिथे आणखी एक डॉक्टर गेल्याने काय फरक पडणार असतो?

## डॉक्टर टिप्स




**पाळीविषयीबोलूया : 'मासिक पाळीदरम्यान जोडीदारासोबत सहवास? योग्य की अयोग्य?**

सहवासच्या संदर्भात प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे असतात. ऐकीव माहितीवर गोष्टी करण्यात काहीच अर्थ नाही. पण मी माझ्या अनुभवावरून सांगू शकते की पाळीदरम्यान सहवास म्हणजे काही विचित्र नाही.

(बीबीसी थ्रीच्या यांच्या वृत्तलेखाचा संपादित अनुवाद)

हे वाचलंत का?

पाळीविषयीबोलूया : 'पाळी सुरू झाली अन् आजीची शेवटची आठवण



हुकली...'पाळीविषयीबोलूया : 'पाळीची रजा म्हणजे मला कमकुवतपणा वाटत नाही'

पाळीविषयीबोलूया : 'त्या चार दिवसांत मी कधीच वेगळी नव्हते...'

पाळीविषयीबोलूया – 'पुरुषांना मासिक पाळी विषयी सज्ञान करण्याची गरज'

पाळीविषयीबोलूया : सॅनिटरी नॅपकिन्सला ५ पर्याय

पाळीविषयीबोलूया – कपड्यांना मागे रक्ताचा डाग पडतो तेव्हा...

## विनोद

सार्वजनिक जीवनात राहताना गडबड, घोटाळा- धोका सर्व काही कर..पण कधी प्रेम करु नको, मुला!



तुला आपल्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाला काय हवं? सिंगापूरची दोन तिकिटं की एक छानसा टेपरेकॉर्डर? अनिलने आपल्या पत्नीला विचारले.

'सिंगापूरची दोन तिकिटंच आणा'

'का ग?'

कारण तिथं गेल्यावर टेपरेकॉर्डर घेता येईल. सिंगापूरला टेपरेकॉर्डर खूप स्वस्त मिळतात.

## संदेश

Har subah teri duniya me roshni kar de
Rab tere gum ko teri khushi kar de,
Jab bhi tootne lage teri san-sein….
Khuda tujme shamil meri zindagi kar de.

## सुविचार



पुष्कळ ग्रंथांचे वाचन करण्यापेक्षा थोड्या ग्रंथांचे मनन केलेले अधिक चांगले.

– ग.त्र्यं. माडखोलकर


**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: । दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ।।**

**अर्थ :** दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. १



## आडवे शब्द

१. गाळ पण टाकाऊ नाही
२अ. ताळतंत्र सुटलेला
५. रोड टॅक्स–मराठीत
८. तोंडाचा पट्टा
११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी
१२. अटीची भाषा
१४. चीज, वस्तू
१५. त्याग केला
१७. अर्धांगवायू
१९. ढीग
२१. सत्ता
२३. उत्तराधिकारी
२४. वाघाची मावशी
२५. शेवट, नाश
२६. मालक, सरदार, शासनसत्ता
२८. पाण्यापासून उत्पन्न
३१. चामखीळ
३३. एकरूप
३४. झाडाचे टॉनिक
३५. सरस्वती (ग्रा.)
३६. बातमी
३७. वारा, त्रास
३८. भांडण
४०. कैफ, धुंदी
४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण
४३. नऊ भावना
४५. कडक व चिवट
४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक
४७. संत, अवलिया
४८. रागाचा ठिकाणा
४९. गंमत, मजा
५०. स्वयंपाकी
५३. आवाजांचा गोंधळ
५४. सन्मानाची रक्कम
५६. खोदकाम
५८. पुत्री, मुलगी
६०. लाकडी जिना
६२. दात
६४. जबरदस्त, धिप्पाड
६७. चेहऱ्यावरील कांती
६८. काळ्या तोंडाचे माकड
७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी
७२.सवाद्य
७४. हिंदीत झणझणीत
७५. गायीचे पिल्लू
७७. शिक्षा
७८. मोगऱ्याची माळ
८०. खूळ
८२. अगदी सरळ
८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा
८४. रश्शावरील तवंग, कट

## उभे शब्द

१. उमदा, रंगेल
२. बतावणी
३. आलेख– चढता वा उतरता
४. पुरुष
५. घागरा
६. बटवा
७. रमापती
८. पृथ्वी, गाय
९. पूर्ण भरतीची वेळ
१०. सिंह
१३. समशेर
१६. पुत्र (हिंदी)
१८. दिवस
२०. लिंबू पाणी
२२. गंध
२४. पतंगाचा धागा
२५. अकस्मात
२६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना
२७. खोकला
२८. पाणी देणारा
२९. फळातील द्रव
३०. वस्ती
३२. जास्तीत जास्त व कमीत कमी
३३. टोळीचा प्रमुख
३४. धोकादायक
३७. संधी
३९. बरोबर आलेला फौजफाटा
४१. शिक्षा
४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४४. संपूर्ण
५०. घराणे
५१. शर्करा
५२. पाडाव, हार
५५. फायदा
५७. पुरुष
५९. वनवास
६१. दार
६३. हुण्डा (हिंदी)
६५. घरंदाज, कुलीन स्त्री
६६. टपालकचेरी
६९. मत देणे
७१. मुंग्यांचे घर
७३. धट्टकट्टा
७६. फटाक्यांची माळ
७७. उथळ पसरट वाटी
७९. रात्र, ८१. निर्माण झालेले अंतर

## आडवे उत्तरे

१.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

## उभे उत्तरे

१.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी




# होता जीवा म्हणून वाचला शिवा...

## रितेश देशमुखच्या राजा शिवाजी मध्ये सलमान खान साकारणार जिवा महाला

मुंबई -बॉलिवूडचा दबंग भाईजान सलमान खान म्हणजे, चाहत्यांच्या गळ्यातील ताईत. साठीला टेकलेल्या भाईजाननं काही दिवसांपूर्वीच शर्टलेस लूक शेअर करून सर्वांना धक्का दिलेला. भाईजानचा फिटनेस, त्याचे सिक्सपॅक ॲब्स पाहून सारेच अवाक् झालेले. आता सलमान खानचा 'बॅटल ऑफ गलवान' सिनेमा येणार आहे. याच सिनेमासाठी सलमाननं खूप मेहनत घेतल्याचं बोललं जात आहे. अशातच आता सलमान खाननं चाहत्यांना नवं सरप्राईज दिलं आहे. 'बॅटल ऑफ गलवान' सोबतच सलमान खान आणखी एका सिनेमात झळकणार आहे, याबाबत नुकतीच अपडेट समोर आली आहे. रितेश देशमुखचा आगामी सिनेमा 'राजा शिवाजी'मध्ये सलमान खान झळकणार आहे. तसेच, तो या सिनेमात छत्रपती शिवरायांच्या आयुष्यातल्या जीवाभावाच्या मावळ्याची भूमिका साकारणार आहे.

गेल्या काही वर्षात बॉलिवूडच्या दिग्गजांच्या सिनेमांना पाहिजे तसं यश मिळालेलं नाही. सलमान खानचे तर सिनेमे बॉक्स ऑफिसवर जोरदार आपटले. रश्मिकासोबत केलेल्या 'सिकंदर'कडून अपेक्षा होती, पण या सिनेमाचीही जादू प्रेक्षकांवर फारशी चालली नाही. अशातच आता सलमान खानच्या 'बॅटल ऑफ गलवान'च्या जोरदार चर्चा रंगल्या आहेत. तसेच, या सिनेमासाठी सलमान खाननं घेतलेली मेहनत पाहता, प्रेक्षकांच्या




अपेक्षा वाढल्या आहेत. तसेच, आता तो रितेश देशमुखच्या छत्रपती शिवरायांवरच्या सिनेमात झळकणार असल्याची माहिती समोर आल्यामुळे भाईजानच्या फॅन्सची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

रितेश देशमुख छत्रपती शिवरायांवर सिनेमा घेऊन येत असून त्याचं नाव 'राजा शिवाजी' असे असणार आहे. प्रेक्षक आतुरतेनं वाट पाहत असणाऱ्या या सिनेमामध्ये सलमान खान आणि त्यासोबतच संजय दत्त सुद्धा झळकणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांवर सिनेमा आधारित आहे. मीडिया रिपोर्टनुसार, सलमान आणि संजय दत्त दोघांचे शूटिंग शेड्युलही लॉक झालं आहे. संजय दत्त खलनायकाच्या भूमिकेत आहे. त्यामुळे त्याचे शेड्युल डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आलं आहे. 'राजा शिवाजी' सिनेमात सलमान कोणती भूमिका साकारणार याचीही उत्सुकता लागली आहे.

'राजा शिवाजी' सिनेमात सलमान खान कोणती भूमिका साकारणार?

रितेश देशमुखच्या आगामी सिनेमात तो स्वत: छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. तर, सलमान खान जिवा महाला या शूर मावळ्याची भूमिका साकारणार आहे. जिवाजी महाले हे छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक होते. दांडपट्टा चालवण्यात तरबेज असणाऱ्या जीवा महाला यांनीच प्रतापगडाच्या लढाईत छत्रपती शिवाजी महाराजांना वाचवले होते. त्यामुळेच ''होता जीवा, म्हणून वाचला शिवा'' हे वाक्य म्हटलं गेलेलं. मीडिया रिपोर्टनुसार, संजय दत्त या सिनेमात अफझल खानाची भूमिका साकारणार आहे.

दरम्यान, सलमान खाननं यापूर्वीही रितेश देशमुखच्या सिनेमांमध्ये कॅमिओ केलेला. रितेश देशमुखचा गाजलेला सिनेमा 'लय भारी'मध्येही सलमान खान दिसलेला. त्यानंतर 'वेड' सिनेमातही तो रितेशसोबत एका गाण्यात दिसलेला.

## आकाश नारायणकर आणि अंजलीबाई शिंदे यांच्या आयुष्यावर आधारित लव्ह यू मुद्दू रिलीजसाठी सज्ज...

मुंबई-'लव्ह यू मुद्दू' शीर्षक आणि आशयानं प्रेक्षकांच्या अपेक्षा दुप्पट केल्या आहेत. पहिल्यांदाच दिग्दर्शक कुमार हे पडद्यावर एक प्रेमकथा घेऊन आले आहेत. हा चित्रपट एका खऱ्या घटनेवर आधारित आहे. दिग्दर्शक कुमार यांनी या चित्रपटावर खूप मेहनत घेतली आहे. महाराष्ट्रातील सोलापूर येथील आकाश नारायणकर आणि अंजली बाई शिंदे या तरुण जोडप्याच्या प्रेमकथेवर चित्रपट बनवण्यात आला आहे. या जोडप्यासाठी प्रेम हेच सर्वस्व आहे. कुमारनं त्यांच्या आयुष्यातील चढ-उतारांची कहाणी सुंदरपणे या चित्रपटाद्वारे मांडली आहे. आकाश आणि अंजली बाई शिंदे प्रेमात पडले आणि त्यांनी लग्न केलं. नवविवाहित जोडपे देवाचे दर्शन घेण्यासाठी गेले, तेव्हा एक अकल्पनीय घटना घडली. त्यांच्याबरोबर काय झालं? त्यांच्या आयुष्यात घडलेली भयानक दुर्घटना काय होती? त्यानंतरचा प्रवास काय होता? हे या चित्रपटात सांगण्यात आलं आहे.



'लव्ह यू मुद्दू' चित्रपटाबद्दल: चित्रपटाच्या टीमनं आकाश नारायणकर आणि अंजली बाई शिंदे यांची भेट घेतली होती. यानंतर त्यांचा व्हिडिओ बनवला होता. आता हा चित्रपट तयार झाल्यानंतर महाराष्ट्रातून या जोडप्याला बोलावण्यात आलं आहे. त्यांना चित्रपट दाखवण्यात आला आहे. हा चित्रपट पाहिल्यानंतर आकाश नारायणकर आणि अंजली बाई खरोखरच भावनिक झाले आणि चाहत्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. सिद्धू मूलीमणी आणि तरुण अभिनेत्री रेश्मा आकाश अंजलीची भूमिका साकारत आहेत. बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या उर्वरित कलाकारांमध्ये राजेश नटरंगा, तबला नानी, गिरीश शिवन्ना, श्रीवत्स आणि स्वाती यांचा समावेश आहे. हा चित्रपट किशन एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली निर्मित करण्यात आला आहे. लक्ष्मीकांत टी.एस. कार्यकारी निर्माता म्हणून टीमचा भाग आहेत. कृष्णा दीपक हे कॅमेरामन आहेत, अनिरुद्ध शास्त्री हे संगीत दिग्दर्शक आहेत आणि सी.एस. दीपू हे संपादक आहेत. हा चित्रपट शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी राज्यभर प्रदर्शित होत आहे. जगदीश फिल्म्स या चित्रपटाचे वितरण करत आहे.

'लव्ह यू मुद्दू' चित्रपटाची प्रेमकहाणी : दरम्यान कुमार यांचा शेवटचा चित्रपट' केमिस्ट्री ऑफ करियप्पा ' हा आहे.तसेच लव्ह यू मुद्दू हा एक भावनिक प्रवास आहे. हा चित्रपट पाहूण अनेकांच्या डोळ्यात पाणी येईल. दिग्दर्शक कुमार या चित्रपटाबाबत म्हणतात की, ''थिएटरमध्ये वास्तविक जीवनातील जोडप्याच्या बंधनाला स्पर्श करणारा सिनेमॅटिक अनुभव प्रेक्षकांना नक्कीच येईल.'' प्रेक्षकांना या चित्रपटाकडून खूप अपेक्षा आहेत. आता हा चित्रपट किती यशस्वी होतो हे पाहणं आता लक्षणीय ठरणार आहे.

## आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटातील अभिनेत्री झायरा वसीमचा झाला निकाह

मुंबई -'दंगल' फेम माजी अभिनेत्री झायरा वसीमचा आता निकाह झाला आहे. २०१९ मध्ये झायरा चित्रपटसृष्टी सोडून गेली होती. ती चित्रपटसृष्टीपासून दूर एकाकी जीवन जगत होती. आता तिनं तिच्या लग्नाचे फोटो शेअर करून तिच्या चाहत्यांना आश्चर्यचकित केलं आहे. झायरानं तिच्या पतीबरोबरचे सुंदर फोटो शेअर केले आहेत. झायरानं तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर निकाहमधील फोटो शेअर करत अभिनंदन व्यक्त केला आहे. झायरानं लग्नाच्या फोटोंमध्ये तिचा किंवा तिच्या पतीचा चेहरा दाखवला नाही, मात्र ती निकाहच्या प्रमाणपत्रावर सही करताना दिसत आहेत.झायरा वसीमचा झाला निकाह : झायरा आणि तिच्या पतीचे व्हायरल झालेले फोटोंना सोशल मीडियावर असंख्य लाईक्स मिळवत आहेत. या फोटोंवर प्रतिक्रिया देऊन अनेकजण तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत. दरम्यान शेअर केलेल्या फोटोंमध्ये झायराचे सुंदर मेंदी लावलेले हात आणि तिच्या लग्नाची अंगठी दिसत आहे. दुसऱ्या फोटोमध्ये झायरा तिच्या पतीबरोबर बसली असून ती कॅमेऱ्याकडे पाठ करून आहे. आता झायरानं तिचे नवीन आयुष्य सुरू केले आहे. एका चाहत्यानं तिच्या पोस्टवर लिहिलं आहे, 'निकाह मुबारक चुऊ बहना.' दुसऱ्या एकानं लिहिलं आहे, 'तुम्हा दोघांचेही अभिनंदन.' आणखी एकानं लिहिलं, 'तुमच्या दोघांना पण खूप खूप प्रेम अभिनंदन.' याशिवाय अनेकजण या पोस्टवर हॉर्ट इमोजी देऊन प्रेमाचा वर्षाव करत आहेत.झायरा वसीमबद्दल : दरम्यान झायरानं २०१६ मध्ये आलेल्या आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटात आमिर खानची मुलगी कुस्तीगीर गीता फोगटची भूमिका साकारली होती. 'दंगल' हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटासाठी तिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २०१७ मध्ये, झायरानं पुन्हा एकदा आमिर खानबरोबर धमाल केली. आमिरनं तिला त्याच्या 'सिक्रेट सुपरस्टार' चित्रपटात घेतलं, या चित्रपटानं देखील खूप कमाई केली.



## सलमान खानने शर्टलेस फोटोंनी सोशल मीडियावर केले वादळ निर्माण...

मुंबई -बॉलिवूड स्टार सलमान खानने काल रात्री ३ नोव्हेंबर रोजी सोशल मीडियावर स्वत:चे दोन शर्टलेस फोटो पोस्ट केले आहेत. या फोटोमध्ये मभाईजानफ जबरदस्त लूकमध्ये असल्याचा दिसत आहे. फोटोत सलमान खानची मजबूत शरीरयष्टी असून त्याचं लूक आता त्याच्या चाहत्यांना खूप आवडत आहे. या फोटोमध्ये त्याचे ॲब्स देखील दिसत आहे. आता सोशल मीडियावर सलमान खानचे हे रूप खूप वेगानं व्हायरल झालं आहे. मभाईजानफच्या फोटोंनी इंटरनेटवर सध्या



खळबळ उडवून दिली आहे. या फोटोंना २० लाखांहून अधिक लाईक्स आणि लाखो व्ह्यूज मिळाले आहेत. सलमान खान सध्या त्याचा आगामी चित्रपट मबॅटल ऑफ गलवानफसाठी खूप मेहनत घेत आहे.

सलमान खाननं पुन्हा शर्ट काढला : फोटो शेअर करताना सलमान खाननं आपल्या पोस्टमध्ये लिहिलं, मफकाहीतरी साध्य करण्यासाठी, तुम्हाला काहीतरी सोडून द्यावे लागते, हे न सोडता झालं आहे.फफ याचा अर्थ असा की सलमाननं त्याच्या आहारात कोणताही बदल न करता मबॅटल ऑफ गलवानफसाठी चांगली बॉडी तयार केली आहे. सलमान खान मबॅटल ऑफ गलवानफ चित्रपटातही शर्टलेस दिसणार आहे. आता पुन्हा एकदा सलमान हा त्याच्या सिग्नेचर शर्टलेस पोझनं थिएटरमध्ये धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज आहे.

मबॅटल ऑफ गलवानफचे दिग्दर्शक अपूर्व लेखिया यांनीही सलमान खानचा शर्टलेस फोटो पोस्ट करत लिहिलं,फखरं सांगायचं तर, तो काहीही सोडत नाही, परिवर्तन.फ

सलमान खानच्या शरीरयष्टीनं चाहते झाले हैराण : मभाईजानफच्या शर्टलेस फोटो हा अनेकांना खूप आवडत आहे. याशिवाय अनेकजण या फोटोच्या पोस्टमध्ये बॉलिवूड स्टारवर प्रेमाचा वर्षाव करत आहेत. एका चाहत्यानं पोस्टमध्ये लिहिलं, मभाईजानफ पुन्हा राज्य करणार आहे.फ दुसऱ्या एकानं लिहिलं, मसलमान पुन्हा एकदा सिद्ध करत आहे की, तो फिटनेस ट्रेंडसेटर आहे.फ आणखी एकानं लिहिलं, मसर लग्न कधी करणार आहे.फ याशिवाय मभाईजानफच्या या फोटोंच्या कमेंट सेक्शनमध्ये फायर इमोजीज देखील चाहते पोस्ट करत आहेत.

## हॉलिवूडवर शोककळा! सहा दशके रंगमंच गाजवणाऱ्या अभिनेत्री डायन लॅड यांचे निधन!

दिल्ली,४ नोव्हेंबर-हॉलिवूडमधून एक दु:खद बातमी समोर आली आहे. सहा दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ घालणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री डायन लॅड यांचे निधन झाले आहे. त्या ८९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर संपूर्ण चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे. चाहत्यांनी आपल्या आवडत्या अभिनेत्रीबद्दल सोशल मीडियावर शोक व्यक्त करायला सुरुवात केली आहे.

मुलगी लॉरा डर्नने दिली माहिती डायन लॅड यांच्या निधनाची माहिती त्यांच्या मुलीने 'ज्युरासिक पार्क' फेम अभिनेत्री लॉरा डर्न हिने दिली आहे. लॉरा डर्नने सोमवारी एक निवेदन प्रसिद्ध करत आईच्या निधनाची पुष्टी केली. लॉराने सांगितले की, त्यांच्या आईचे निधन कॅलिफोर्नियातील ओहाई येथील त्यांच्या घरात झाले. निधनाच्या वेळी लॉरा स्वत: आईसोबत होती, मात्र निधनाचे नेमके कारण तिने जाहीर केले नाही.

''आई माझी खरी हिरो होती'': लॉरा डर्न आईच्या निधनानंतर लॉराने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर केली. तिने लिहिलं, ''ती एक विलक्षण व्यक्ती होती. सर्वोत्तम कन्या, प्रेमळ आई, जिव्हाळ्याची आजी, गुणी अभिनेत्री, संवेदनशील कलाकार आणि सहानुभूतीने ओथंबलेली.अशा व्यक्तीचा जन्म जणू स्वप्नांतच घडवला असावा. ती आमच्यासोबत होती, हे आमचे मोठे भाग्य होते.''

डायन लॅड यांच्या निधनाचे कारण काय?डायन लॅड यांच्या निधनाची घोषणा ३ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. त्यांच्या निधनाचे नेमके कारण अद्याप अधिकृतरीत्या जाहीर झालेले नाही, मात्र काही वर्षांपूर्वी त्यांना खवळेरींहळल झींश्रोपरीू ऋळ-लींळी (खझऋ) नावाचा गंभीर फुफ्फुसाचा आजार झाल्याचं त्यांनी स्वत: कबूल केले होते. या आजारात फुफ्फुसांचे ऊतक हळू-हळू कठीण आणि जखमी होत जाते, ज्यामुळे श्वास घेणे अवघड होते. हा आजार बरा करता येत नसला तरी त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य असते. अधिक वेदनादायक म्हणजे, फक्त तीन महिन्यांपूर्वीच लॅड यांच्या पतीचा रॉबर्ट चार्ल्स हंटर (झर्शीळिउे ऋेन्न ड्रीशिी चे माजी सीईओ) ऑगस्ट महिन्यात ७७ व्या वर्षी मृत्यू झाला होता. त्यांच्या निधनानंतर अल्पावधीतच डायन लॅड यांनीही जगाचा निरोप घेतला, त्यामुळे त्यांच्या जवळच्या लोकांमध्ये भावनिक शोक व्यक्त केला जात आहे.

तीन वेळा ऑस्करसाठी नामांकन डायन लॅड यांना १९७४ साली दिग्दर्शक मार्टिन स्कॉर्सेसी यांच्या क्लासिक चित्रपट 'अश्रळलश ऊेशीप'ीं ङळींश हशीश अपूीश' मधील 'फ्लो' या वेट्रेसच्या भूमिकेमुळे मोठी ओळख मिळाली. या भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्तम सहाय्यक अभिनेत्री या श्रेणीत ऑस्करसाठी पहिल्यांदा नामांकन मिळाले होते.दीर्घ आणि यशस्वी कारकीर्द



१९३५ साली मिसिसिपी येथे रोझ डायन लॅडनर या नाव-ाने जन्मलेल्या डायन लॅड यांनी अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून हॉलिवूडमध्ये आपलं स्थान निर्माण केलं. त्या सुरुवातीला नर्तिका, मॉडेल आणि रंगभूमीवरील अभिनेत्री म्हणून कार्यरत होत्या. नंतर त्या अर्लीीी ड्रींवळे मध्ये प्रशिक्षण घेत न्यूयॉर्कमध्ये करिअर घडवू लागल्या. त्यांच्या अभिनय कारकिर्दीला मोठं वळण मिळालं १९७४ मध्ये मार्टिन स्कॉर्सेसी यांच्या क्लासिक चित्रपट 'अश्रळलश ऊेशीप'ीं ङळींश हशीश अपूीश' मधून. या चित्रपटात त्यांनी धाडसी आणि स्पष्टवक्ती वेट्रेस 'फ्लो'ची भूमिका साकारली, ज्यासाठी त्यांना सर्वोत्तम सहाय्यक अभिनेत्री या श्रेणीत पहिल्यांदा ऑस्करसाठी नामांकन मिळाले.

यानंतर त्यांनी 'थळश्रव रीं हशरीीं' (१९९०) आणि 'ठरालश्रळपस ठेिश'

## स्टार सेलिना जेटलीचा भाऊ यूएईमधील तुरुंगात बंद, भारत सरकारला केली विनंती...

मुंबई -बॉलिवूड अभिनेत्री सेलिना जेटलीनं तिच्या भावाच्या सुरक्षिततेसाठी आणि सुटकेसाठी दिल्ली उच्च न्यायालयाकडे धाव घेतली होती. आता या याचिकेवर ३ नोव्हेंबर रोजी सुनावणी करण्यात आली. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव सप्टेंबर २०२४ मध्ये सेलिनाच्या भावाला यूएईमध्ये ताब्यात घेतलं होतं. तसेच न्यायालयानं परराष्ट्र मंत्रालयाला (चएअ) अभिनेत्री आणि तिच्या भावामधील संवाद सुलभ करण्याचे आणि भारतीय नागरिक म्हणून कायदेशीररित्या आवश्यक ते सर्व काही गोष्टी करण्याचे आदेश दिले आहेत. सेलिना जेटलीचा भाऊ एक वर्षापासून यूएईच्या तुरुंगात बंद आहे. दरम्यान सुनावणीदरम्यान सेलिना न्यायालयात उपस्थित होती. याप्रकरणी बोलताना अभिनेत्रीने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे.

सेलिना जेटलीची पोस्ट : सेलिना जेटलीनं आपल्या पोस्टमध्ये लिहिलं,'आशेची किरण... १४ महिन्यांच्या कठोर परिश्रमानंतर, मी अखेर अंधाऱ्या बोगद्याच्या शेवटी एका प्रकाशापर्यंत पोहोचली आहे. मी नुकतीच दिल्ली उच्च न्यायालयातून बाहेर येत आहे, जिथे माझ्या भावासंदर्भात याचिकेवर सुनावणी झाली.' अभिनेत्रीनं आपल्या पोस्टमध्ये पुढं लिहिलं, 'भाऊ, तुम्ही आमच्यासाठी लढलात, आता तुमच्या मागे उभे राहण्याची वेळ आली आहे. एक वर्षापासून मी तुमच्यासाठी उत्तरे शोधत आहे. आता



मी आपल्या सरकारला तुमच्यासाठी लढण्यासाठी आणि तुम्हाला देशात सुरक्षितपणे परत आणण्यासाठी प्रार्थना करत आहे. माझा आता एकमेव आधार सरकार आहे, ज्यावर मी विश्वास ठेवते, भारत सरकार आणि मला खात्री आहे की, ते या चौथ्या पिढीतील सैनिकाचे रक्षण करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करतील, एका युद्धातील अनुभवी सैनिकाचा मुलगा, नातू आणि पणतू ज्यानं आपले जीवन, आपलं संपूर्ण तारुण्य, आपल्या देशाच्या सेवेसाठी आणि एधअएच्या शौर्याचे धारक म्हणून समर्पित केले आहे.''

सेलिना जेटलीचा परराष्ट्र मंत्रालयाविरुद्ध आरोप : सेलिना जेटली यांनी त्यांच्या याचिकेत दावा केला आहे की, तिच्या भावाविरुद्ध दाखल केलेल्या खटल्याच्या स्थितीबद्दल कुटुंबातील सदस्यांना अचूक माहिती दिली गेली नाही. गेल्या वर्षात भारतीय दूतावासानं फक्त चार वेळाच कॉन्सुलर ॲक्सेस दिला आहे, असेही यात म्हटलं गेलं आहे. परराष्ट्र मंत्रालयानं आतापर्यंत त्यांच्या भावाची स्थिती, कायदेशीर प्रक्रिया आणि आरोग्याबद्दल माहिती देण्यात निष्काळजीपणा दाखवली आहे, असाही आरोप सेलिनानं केला आहे. यामुळं त्यांनी न्यायालयाला आवाहन केलं आहे, की केंद्र सरकारला त्यांच्या भावाला कायदेशीर मदत, नियमित कॉन्सुलर ॲक्सेस आणि कुटुंबाशी थेट संवाद साधण्यास मदत करण्यास सांगितले पाहिजे आणि त्यासाठी त्वरित कारवाई करण्याची विनंती यात केली गेली आहे. आता न्यायालयानं परराष्ट्र मंत्रालयाला यूएईमध्ये अटकेत असलेल्या सेलिनाचा भाऊ विक्रांत जेटली यांना कायदेशीर मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच कुटुंबाला नियमित अपडेट देण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.



सेलिना जेटलीच्या वकिलांचा केंद्र सरकारवर आरोप : सेलिना जेटलीच्या वकिलानं असा आरोप केला आहे की, परराष्ट्र मंत्रालयानं अद्यापही विक्रांत जेटलीच्या प्रकृतीबद्दल काहीही माहिती दिलेली नाही. मेजर जेटली यांना कॉन्सुलर ॲक्सेस (सरकारी प्रतिनिधीशी भेट) देण्यात आला आहे. याशिवाय या याचिकेत असं म्हटलं गेलं आहे की, मेजर जेटली भारतीय सैन्यात सेवा करत होते आणि लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेचा भाग होते. ते युएईमध्ये एका कन्सल्टन्सी फर्ममध्ये काम करत होते, त्यानंतर त्यांचे पत्नीसमोर मॉलमधून अपहरण करण्यात आले. तसेच सेलिनानं आपल्या मदत पोर्टलवर याबद्दल तक्रार दाखल केली होती, मात्र तिला कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. यानंतर तिनं भारतीय दूतावासाशीही संपर्क केला, मात्र तिथून देखील तिला कुठलही मदत मिळाली नाही. आता या प्रकरणी पुन्हा ४ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

सेलिना जेटलीनं मानले आभार : अभिनेत्रीनं दिल्ली उच्च न्यायालयाला 'धन्यवाद' म्हटलं असून तिनं न्यायालयाच्या निर्देशानंतर, सोशल मीडियावर कृतज्ञतेची एक पोस्ट शेअर केली आहे. तिनं आपल्या एक्स पोस्टमध्ये लिहिलं, 'सैनिकाची कहाणी, एका सैनिकाच्या बाजूनं उभे राहणे, मेजर (निवृत्त) विक्रांत कुमार जेटली यांच्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाकडून आशेचा किरण.'

## वंदे मातरम् सार्धशताब्दीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन



**निलंगा/प्रतिनिधी** : येथील गोविंदराव पाटील विद्यालयात वंदेमातरम् सार्धशताब्दीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले. होते या उपक्रमांतर्गत निबंध व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निलंगा येथील तहसीलदार कुलकर्णी व गटशिक्षणाधिकारी संतोष स्वामी व इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितराव धुमाळ व संस्थेच्या सचिव प्रतिभाताई धुमाळ, कोषाध्यक्ष डॉ. आदित्य पंडितराव धुमाळ व संस्था समन्वयक पांडुरंग पाटील, अतुल शिंदे सर्व विभागाचे मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## विश्वधर्मी डॉ. वि.दा. कराड यांच्या हस्ते जिल्हाध्यक्ष विजयकुमार गुत्ते यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, लातूर जिल्हा अध्यक्षपदी विजयकुमार गुत्ते यांची नुकतीच निवड झालेली आहे त्याबद्दल त्यांचा सत्कार रामेश्वर (रुई)चे भूमिपुत्र विश्वशांती विद्यापीठाचे संचालक, विश्वधर्मी डॉ.वि. दा. कराड यांच्या हस्ते रामेश्वर येथे सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी विजयकुमार गुत्ते यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की रामेश्वर हे गाव मानवता, सामाजिक सलोखा, सर्वधर्मसमभाव व राष्ट्रीय एकात्मता इत्यादी मूल्य जोपासणारे महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील गाव म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी असलेले श्रीराम मंदिर, बौद्ध विहार, मस्जिद, राम रहीम सेतू, महालक्ष्मी मंदिर, गोपाळ बुवा मंदिर अतिशय सुंदर व देखण्या स्वरूपात निर्मिती करण्यात आले असून इथे कुस्तीपटू निर्माण करण्यासाठी कुस्तीचा आखाडा ही तयार केलेला आहे. याच भूमीत शिकलेले सात पैलवान हिंदकेसरी पर्यंत पोहोचलेले आहेत. ज्या महात्म्यांनी म्हणजेच गौत्तम बुध्द्धांनी जगाला शांतीचा संदेश दिला, महात्मा गांधींनी बुरा मत सुनो, बुरा मत कहो, बुरा मत देखो, हा संदेश देशाला दिला, तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान,जय किसान हा संदेश देशाला दिला त्याचप्रमाणे आज विश्वधर्मीय महान तत्ववेते मा.डॉ. वि.दा. कराड साहेब आज संपूर्ण देशाला अध्यात्म,ज्ञान,विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा संदेश देत असताना राष्ट्रीय ऐक्याच, सामाजिक सलोख्याचं आदर्श ग्राम हे गांधीजींच्या तत्वांना अनुसरून खेड्याकडे चला या उक्तीप्रमाणे आपल्या जन्मभूमीला विकसित करत असताना आम्हाला खरोखरच त्यांचा सार्थ अभिमान वाटतो असे मत जिल्हाध्यक्ष विजयकुमार गुत्ते यांनी व्यक्त केले.

हे सर्व वैभव पाहण्यासाठी विजयकुमार गुत्ते व त्यांचे मित्र मंडळ रामेश्वर येथे गेले असता डॉ.वि. दा.कराड यांच्याशी अनौपचारिकपणे गप्पा झाल्या. नुकतेच रामेश्वर येथे जागतिक कीर्तीचे मानवतातीर्थ भव्य दिव्य असे सभामंडप आकारास येत असून १४ नोव्हेंबर २०२५ रोजी उद्घाटन करण्यात येणार आहे. अशी माहिती वि. दा. कराड यांनी दिली. विजयकुमार गुत्ते यांनी डॉ.वि. दा. कराड, तुळशीराम अण्णा कराड, काशीराम कराड, सचिन मुंडे यांचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी डॉ.नागेश पाटील, लक्ष्मण दावणकर, राजेसाहेब थळकर,दादा दंडगुले,चेअरमन केदार बिडवे, राजेंद्र मंठाळे, सिद्धलिंग मेंडोळे, वीरभद्र कलबुर्गे,चंद्रकांत पाटील, संग्राम बमणे, गोपीनाथ उलपे, रामेश्वर कोळसरे, बालाजी म्हेत्रे इत्यादी उपस्थित होते.

## मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापकांनी सोलापूर विभागाची व्यापक पाहणी केली

**सोलापूर/प्रतिनिधी** :मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री विजय कुमार यांनी सोलापूर रेल्वे विभागातील प्रमुख ठिकाणांची विस्तृत पाहणी केली. या भेटीत पायाभूत सुविधा विकास, प्रवासी सुविधा, कोचिंग सुविधा आणि भविष्यातील विस्तार कामांवर लक्ष केंद्रित केले गेले, जे रेल्वेची ऑपरेशनल कार्यक्षमता आणि ग्राहक सेवा सुधारण्याची वचनबद्धता दर्शवते.

महाव्यवस्थापक यांनी खालील गोष्टींची पाहणी केली:




– वाडी–शहाबाद दरम्यान चालू कामांचा आणि ऑपरेशनल तयारीचा आढावा घेतला. – हिरेनंदुरू येथे भविष्यात होणाऱ्या प्रकल्पासाठी ची प्रस्तावित ग्रीनफील्ड जागेची तपासणी केली – कलबुरगि येथे, नियोजित कोचिंग सुविधा व कामांची विस्तृत पाहणी केली. – टिकेकरवाडी येथे, भविष्यातील वाहतूक मागणीसाठी कोचिंग पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी कोचिंग कॉम्प्लेक्स आणि त्याच्या मास्टर प्लॅनचा आढावा घेतला. – होटगी येथे, अल्ट्राटेक सिमेंट साइडिंगची पाहणी केली. – बाळे स्थानक येथे, मालवाहतूक हाताळणी क्षमता वाढवणे आणि वाहतूक सुधारणे या उद्देशाने प्रस्तावित मालवाहतूक शेड साइटला भेट दिली. – सोलापूर येथे, कोचिंग डेपोमधील सुविधांचा आढावा घेतला, देखभाल तयारी आणि प्रवासी सेवा पायाभूत सुविधांचे मूल्यांकन केले.

नंतर, श्री विजय कुमार यांनी सोलापूर विभागाच्या शाखा अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. त्यांनी चालू कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि भविष्यातील विकासात्मक उपक्रमांसाठी मौल्यवान मार्गदर्शन केले. त्यांचे निर्देश सुरक्षितता, कार्यक्षमता, पायाभूत सुविधा वाढवणे, चांगला प्रवासी अनुभव आणि कर्मचारी कल्याण यावर केंद्रित होते.

महाव्यवस्थापकांसोबत प्रधान मुख्य अभियंता (PCE), प्रधान मुख्य यांत्रिक अभियंता (PCME), मुख्य प्रवासी वाहतूक व्यवस्थापक (CPTM), विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM), सोलापूर आणि विभागातील इतर शाखा अधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकारी होते.

सोलापूर विभागातील प्रवाशांना आणि मालवाहतूक ग्राहकांना पायाभूत सुविधांचे अपग्रेड, सुविधांचा विस्तार आणि सुधारित आणि विश्र्वासार्ह सेवा प्रदान करण्यासाठी मध्य रेल्वेच्या सततच्या प्रयत्नांवर ही तपासणी अधोरेखित करते.

# विलास साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचे बॉयलर अग्निप्रदिपन संपन्न; ८ लाख मे. टन गाळपाचे उद्दिष्ट





**लातूर/प्रतिनिधी** : या वर्षी कार्यक्षेत्रात ऊसाची उपलब्धता मोठया प्रमाणात आहे. या अनुषंघाने गळीत हंगामात उच्चांकी ऊसाचे गाळप आणि ऊच्चांकी साखर ऊतारा मिळवण्यासाठी साखर कारखाना प्रशासनाने सज्ज रहावे, असे आवाहन कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांनी केले.

विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी कारखान्याच्या गळीत हंगाम सन २०२५–२६ चे बॉयलर अग्निप्रदिपन शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते सर्व संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी त्या बोलत होत्या.

यावर्षी मृगासह परतीचा पाऊस चांगला झाला आहे. यामुळे कारखाना कार्यक्षेत्रासह जिल्हयात ऊसाचे क्षेत्र वाढले आहे. कार्यक्षेत्रातील ऊसाचे क्षेत्र पाहता कारखाना हंगाम यशस्वीपणे पार पडण्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. सुरु होत असलेल्या गळीत हंगामातील ८ लाख मे. टन ऊसाचे गाळप उदिष्टय साध्य करण्यासाठी कारखाना सज्ज केला असून गळीत हंगामात कारखाना पूर्ण क्षमतेने चालावा, हंगाम सुरु असतांना तांत्रीक कारणाने कारखाना बंद राहणार नाही यासाठी हंगाम बंद काळातील कामे चांगल्या प्रकारे करण्यात आली आहेत.

कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते सर्व संचालकांच्या उपस्थितीत बॉयलर अग्निप्रदिपन कार्यक्रम प्रसंगी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पुतळयास अभिवादन करण्यात आले. तसेच नवीन हार्वेस्टरचे पूजनही यावेळी करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर विलास कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख, व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, ट्वेन्टीवन शुगर्सचे व्हा.चेअरमन विजय देशमुख, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, कार्यकारी संचालक आत्माराम पवार, संचालक सर्वश्री रविंद्र काळे, अमृत जाधव, सतिश शिंदे (पाटील), अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, रंजीत पाटील, रसुल पटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने व रमेश देशमुख उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख पूढे बोलतांना म्हणाल्या, विलास कारखानाची वाटचाल पाहून आदरणीय साहेबांच्या धोरणा प्रमाणे त्यांचे कार्य पूढे जात आहे हे पाहून आनंद होत आहे. आम्ही तुमचे आहोत आणि तुम्ही आमचे आहात आपली कोणतीही अडचण असल्यास तुम्ही हाक मारा, आम्ही आपल्या मदतीला धावून येऊ असे सांगीतले.


यावेळी व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे यांनी गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शुभेच्छा दिल्या. लातूर जिल्हयामध्ये सहकार आणि साखर उदयोग आपल्या नेतृत्वाने उभा केला या माध्यमातून आपला सर्वांचा विकास झाला आहे. यामध्ये साखर कारखान्याचे योगदान मोलाचे आहे. यामुळे येणाऱ्या हंगामात चांगले गाळप होण्यासाठी सर्वांनी योगदान दयावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी केले. यावेळी बोलतांना ते म्हणाले, गळीत हंगामाची जय्यत तयारी झाली आहे. कारखाना तांत्रीकदृष्टीने बंद राहणार नाही यांची काळजी घेऊन गाळप उदीष्टय पूर्ण केले जाईल. तसेच या वर्षीच्या हंगामात विक्रमी गाळपाचे आणि साखर उताराचे उदीष्टय साध्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

प्रारंभी विलास साखर गणेशोत्सव मंडळाकडून कर्मचाऱ्यासाठी घेण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धांतील विजेत्यांना आणि कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांना चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते पारीतोषिक देण्यात आले. तसेच बॉयलर अग्नी प्रदिपन प्रसंगी बॉयलर अटेडंन्ट पद्माकर चौगुले, हनमंत शेडगे, सुर्यकांत माळी, जानुमियॉ शेख, दत्ता शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. बॉयलर अग्निप्रदीपन प्रसंगीची महापूजा संचालक हणमंत पवार आणि सौ. व्दारका पवार यांच्य हस्ते करण्यात आली.

सुत्रसंचालन राहूल इंगळे यांनी केले तर आभार संचालक शाम बरुरे यांनी मानले. कार्यक्रमास सर्व सभासद, ऊसउत्पादक, ठेकेदार, अधिकारी, कर्मचारी, कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.

# नगर परिषद निवडणुकीसाठी भाजपाकडे इच्छुकांची मोठी गर्दी




**अहमदपूर/प्रतिनिधी** :होऊ घातलेल्या अहमदपूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून निवडणुक लढवण्यासाठी उमेदवारांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र आज बैठकीत दिसून आले. अहमदपूर शहरातील रेड्डी पेट्रोल पंपा समोरील भाजपा चे शहराध्यक्ष ॲड अमित रेड्डी यांच्या कार्यालयात भारतीय जनता पक्षाने नियुक्त केलेले प्रभारी बसवराज पाटील कौळखेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षाकडून इच्छुक उमेदवारांची एक व्यापक बैठक घेण्यात आली. महायुती मधुन लढायचे की स्वंतत्र लढायचे यावर सदरील बैठकीत विचार मंथन करण्यात आले.

इच्छुक उमेदवारांच्या भावना पक्ष श्रेष्ठीनां लेखी स्वरूपात देणार असून महायुती मधुन की स्वंतत्र लढायचे यावर श्रेष्ठीचा लवकरच आदेश प्राप्त होईल तो पर्यंत सर्व इच्छुक उमेदवारांनी तयारीला लागण्याची अहवान भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा अहमदपूर नगर परिषद निवडणुक प्रभारी बसवराज पाटील कौळखेडकर यांनी केले आहे.

सदरील बैठकीत माजी नगराध्यक्ष ॲड. भारत चामे, माजी सभापती अशोक काका केंद्रे, राजकुमार मजगे, गणेश दादा हाके पाटील, बालाजी गव्हाने,शहराध्यक्ष ॲड अमित रेड्डी, ज्ञानोबा बडगिरे, स्वयंप्रकाश हंगे, प्रताप पाटील, बबलू पठाण, ओम पुणे, रामनंद पलमटे यांच्या सह भारतीय जनता पक्षाचे नेते पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक गोविंद गिरी यांनी करून अहमदपूर नगर परिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून इच्छुक उमेदवारांची माहिती यावेळी गोविंद गिरी यांनी बैठकीत दिली. ॲड.अमित रेड्डी,डॉ. सिद्धार्थ कुमार सुर्यवंशी, डॉ. निलेश मजगे, ॲड. स्वप्नील व्हते, जिवण गायकवाड, अरुण वाघबंर,ॲड.निखील कासनाळे,गजानन मुंडे, मन्नान शेख, ओमकार पुणे, प्रणिता बेंबळे,जगन्नाथ मामडगे अदिसह अनेक इच्छुक उमेदवारांनी महायुती की स्वतंत्र निवडणुक लढवण्या संदर्भात बैठकीत आपली मते मांडली .





## दयानंद विधी महाविद्यालयात वंदे मातरम् समूह गान

**लातूर/प्रतिनिधी** : दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित दयानंद विधी महाविद्यालयात वंदे मातरम गीताच्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वंदे मातरम समूह गान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रस्तुत महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. संगीता महाजन यांनी वंदे मातरम या गीताचे अलौकिकत्व अधोरेखित करताना उपस्थितांना देशभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. यानंतर या कार्यक्रमप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश काटेकर यांनी वंदे मातरम गीताच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेत विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्यलढा, बंकिमचंद्र चटर्जी यांच्याद्वारे वंदे मातरम गीताची निर्मिती, ह्या गीताची महती, ह्या गीतामुळे सर्वसामान्य भारतीयांच्या मनात निर्माण झालेली जज्वल्य देशभक्ती इत्यादी बाबतीत सविस्तर माहिती दिली. यानंतर सर्वांनी उत्स्फूर्तपणे आणि उत्साहाने वंदे मातरम या गीताचे समूह गान केले.

विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय अभिमानाची आणि एकात्मतेची भावना दृढ झाली. या समूहगानप्रसंगी महाविद्यालयात राष्ट्रभक्ती आणि एकात्मतेचा मिलाफ अनुभवयास मिळाला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अतिश तिवारी, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी, प्रा. शामराव पाटील तसेच सर्वांनी परिश्रम घेतले.



## वैशाली विलासराव देशमुख यांची बाभळगाव निवासस्थानी महीला पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट

**लातूर/प्रतिनिधी** : विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांची माजी जिप सदस्या सुनीता आरळीकर यांच्या सोबत महीला पदाधिकाऱ्यांनी शनीवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी भेट घेतली.

विलास साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांची बाभळगाव निवासस्थानी सुनीता आरळीकर यांच्या सोबत महीला पदाधिकारी लता काटे, दीपाली आदमाने, वर्षा सोनवणे, आरती देढे, आश्लेषा आदमाने, कोमल आदमाने, अनुराधा सोनवणे, ज्योती सोनवणे, शिला भुंबे, भाग्यश्री शेळके आदींनी भेट घेतली.

यावेळी चेअरमन वैशाली विलासराव देशमुख आणि महीला पदाधिकारी यांच्यात विविध विषयावर चर्चा पार पडली.

## राजा नारायनलाल लाहोटी इंग्लिश स्कूलला पर्यावरण सरंक्षणसाठी इंडियन ग्रीन बिल्डींग कौन्सिल ची सदस्यता

**लातूर/प्रतिनिधी** : येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलला इंडियन ग्रीन बिल्डींग कौन्सिल ची सदस्यता प्राप्त झाली आहे. पर्यावरण संवर्धन जलसंवर्धन व ऊर्जा बचत या विषयावर केलेल्या कार्यास लाभलेली ही उपलब्धी आहे

इंडियन ग्रीन बिल्डींग कौन्सिल पर्यावरण सरंक्षण करणे, उर्जा सरंक्षण आणि हरित वातावरण यांचे बचत व संरक्षण करणारी संस्था आहे. या संस्थेद्वारे व्यक्ती आणि संस्था यांना ही संस्था वेगवेगळ्या श्रेणीत सदस्य बनवीत असते. यातच राजा नारायानलाल लाहोटी इंग्लिश स्कूल ला सदस्यता मिळाली आहे. शाळेचे चेअरमन आनंदजी लाहोटी यांनी हे सदयता स्वीकारली.या प्रसंगी, प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू, उर्जा लेख परीक्षक केदार खमितकर, इन्जिनेअर किरण खमितकर व रजिस्टार प्रवीण शिवणगिकर उपस्थित होते.

सदस्यता मिल्यानंतर संस्था व इंडियन ग्रीन बिल्डींग कौन्सिल चे वेगवेगळे प्रशिक्षण, हरित निर्माण जागरुकता अभियान व इतर अभियानात सहभागी होता येईल. आता राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल या संस्थे अंतर्गत पर्यवान संरक्षण, उर्जा दक्षता, हरित परिसर आणि सतत विकास करण्यासाठी तत्पर राहणार आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात कार्तिक स्नान काकड आरतीची झाली सांगता



भूम (प्रतिनिधी)- शहरातील सर्वात प्राचीन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर ट्रस्ट साळेवाडा, भूम येथे यावर्षीची कार्तिक स्नान काकड आरतीची सांगता त्रिपुरा पौर्णिमेच्या दिवशी, दिनांक ५ नोव्हेंबर रोजी (बुधवार) करण्यात आली.

कोजागिरी पौर्णिमेपासून ते त्रिपुरा पौर्णिमेपर्यंत दररोज पहाटे सव्वा पाच वाजता मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या मूर्तींना दही, दूध, पंचामृत स्नान करून नैवेद्य आणि आरती केली जाते. या काळात दिवाळी पाडवा आणि एकादशीच्या दिवशी महिलांकडून श्री विठ्ठल-रुक्मिणीला नवीन वस्त्र अर्पण करण्याची परंपराही जपली जाते. यावर्षीच्या सांगता सोहळ्यात सुमारे ३५ महिला व १० पुरुष भक्त सहभागी झाले होते. पुजारी श्रीरामनाथ बाबर आणि मंदिर ट्रस्टच्या वतीने सर्वांना रिटर्न गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमामुळे महिला भक्तांचा आनंद द्विगुणित झाला.

५ नोव्हेंबर रोजी शारदा महामुनी बाई यांच्या वतीने समर्थ नगर येथील स्वगृहावर सांगता महाप्रसादाची पंगत आयोजित करण्यात आली असून, भाविकांनी या प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी सोमनाथ बाबर, श्रीकांत लिंगखामकर, सुभाष जिकरे, सागर टकले, योगेश आसलकर, विठ्ठल बागडे, सुरेश खामकर, दत्तात्रेय बागडे, साधना कोकणे, शारदा महामुनी आणि उज्वला बाबर यांचे सहकार्य लाभले.

# खामसवाडी शाळेतील पाच विद्यार्थिनींची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी झाली निवड



कळंब(प्रतिनिधी)- तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशाला येथील पाच विद्यार्थिनींची राज्यस्तरावरील क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राज्याच्या क्रीडा विभागामार्फत दरवर्षी शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार तालुका, जिल्हा, विभाग व राज्य अशा स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येतात. यंदाच्या क्रीडा स्पर्धेद्वारे खामसवाडीतील पाच विद्यार्थिनींनी दोन क्रीडा स्पर्धात राज्य पातळीवर धडक मारली आहे.

ट्रिपल जंप या प्रकारात खामसवाडीची विद्यार्थिनी कुमारी सई सुनील शेळके ही विभागात द्वितीय क्रमांक मिळवत राज्य पातळीवर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्यासाठी ती पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत लातूर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. दुसरा प्रकार ४ बाय ४०० रिले यात खामसवाडीच्या संघाने जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत लातूर विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्यात सई सुनील शेळके, अमृता सातलिंग लोखंडे, सानवी विशाल शेळके व दीपिका विठ्ठल जोशी या खामसवाडी खेळाडूंचा सहभाग होता. त्यांनी विभागात प्रथम क्रमांक मिळवत चिपळूण येथे होणाऱ्या राज्यपातळीवरील स्पर्धेसाठी लातूर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा निदेशक गणेश करंजकर यांनी मार्गदर्शन केले.

या त्यांच्या यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राम शेळके व सर्व सदस्य, मुख्याध्यापक रामचंद्र पवार, गावचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील तसेच सर्व ग्रामस्थांकडून कौतुकांचा वर्षाव होत आहे. गेल्या वर्षीही प्रशालेची खेळाडू सई सुनील शेळके हिने विभागस्तरावर धाराशिव जिल्ह्याचे उंच उडी या प्रकारात प्रतिनिधित्व केले होते.

# अवैध तंबाखु पानमसाला विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

तामलवाडी(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत रविकांत वय ३१ वर्षे, रा.मसला खुर्द ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०६.११.२०२५ रोजी २२.०० वा. सु.मारुती मंदीराचे शेजारी असणारे टपरीमध्ये मसला खुर्द येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ तंबाखु जन्य पदार्थाची विक्री करीता असताना तामलवाडी पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- कलम ६ (अ),२४ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादन जाहितरातीस प्रति व वाणिज्य पुरवठा विनीमय अधिनियम २००३ अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# अपघातात एकजन गंभीर जखमी होवून मयत तर महिला किरकोळ व गंभीर जखमी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी नामे-मंगलबाई संजय साळुंके, वय ६० वर्षे, रा. जमालपुर ता. औसा जि. लातुर व सोबत मयत नामे -महेश श्रीमंत तिप्पणबोणे, रा. नदीहत्तरगा ता. निलंगा जि. लातुर व सोबत २० ते २५ इसम हे दि.०९.१०.२०२५ रोजी लातुर ते तुळजापूर येणारे एनएच ३६१ रोडवर वडगाव लाख शिवारातील नायरा पेट्रोल पंपाचे पुढे काही अंतरावर रोडवरुन पायी जात होते. दरम्यान वाहन टाटा मॅजीक क्र एमएच १३ बीएन ६३०२ चा चालक संतोष रा. नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी त्याचे ताब्यातील टाटा मॅजीक वाहन हे हायगयी व निष्काळजीपणे चालवून मंगलबाई साळुंके व महेश तिप्पणबोणे यांना पाठीमागुन धडक दिली. या अपघातात महेश तिप्पण बोणे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर मंगलबाई साळुंके या किरकोळ व गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामेमंगलबाई साळुंके यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# डॉ. आंबेडकर सहकारी साखर कारखान्याचा २२ वा गळीत शुभारंभ नऊ लाख टनाचे गाळपाचे उद्दिष्ट: निलेश बारखडे पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- डॉ.आंबेडकर सहकारी साखर कारखान्याचा २२ वा गळीत शुभारंभ करण्यात आला असून नऊ लाख टनाचे गाळपाचे उद्दिष्ट- निलेश बारखडे पाटील सुरुवातीला कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. सूर्यकांत डाके डीसलरी मॅनेजर श्री. रहीम सय्यद या मान्यवरांच्या शुभ हस्ते विधिवत पूजा करून गव्हानित उसाची मोळी टाकून कारखाना सुरू करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अरविंद दादा गोरे साहेब यांनी भूषविले.

सुरुवातीला प्रास्ताविक मनोगतामध्ये कारखान्याचे संचालक निलेश पाटील यांनी कारखान्याच्या स्थापनेपासून कारखाना नैसर्गिक आपत्तीमुळे कमी पर्जन्यमाळामुळे तीन हंगाम बंद होता परंतु इतर हंगामामध्ये कारखान्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या सर्व उसाचे गाळप करून ऊस जास्त असताना सुद्धा परिसरातील ऊस संपल्याशिवाय कारखाना बंद केला नाही याची आठवण करून दिली. चालू हंगामामध्ये पंधरा हजार हेक्टर उसाची नोंद कारखान्याकडे झाल्याचे सांगून इतर विल्हेवाट वजा जाता नऊ लाख टन गाळपाचे उद्दिष्ट असल्याचे नमूद केले.

परिसरातील शेतकऱ्याला आजपर्यंत एफ आर पी प्रमाणे भाव दिला आहे पाठीमागच्या काळात एफआरपी पेक्षा सुद्धा ज्यादा दर या कारखान्याने दिल्याचे सांगितले. चालू हंगामामध्ये उसाच्या भावाची स्पर्धा वाढल्याने परिसरातील शेतकऱ्याला चांगला भाव देता यावा आणि सुरुवातीपासून रिकव्हरी वाढावी याच्यासाठी कारखान्याने मागच्या वर्षी जाणीवपूर्वक ६७१, दहा हजार एक या ऊस जातीच्या रोपाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्याला हेक्टरी हेटरी पाच हजार रुपये अनुदान दिल्याचे नमूद केले.

शेतकऱ्यांनी त्याला चांगला प्रतिसाद दिल्यामुळे यावर्षी सुरुवातीपासून आपले रिकवरी वाढण्यास निश्चित मदत झाली आहे.

आपल्या कारखान्याच्या वाटचालीमध्ये सुरुवातीपासून सर्वसामान्य शेतकरी हा केंद्रबिंदू समोर ठेवऊन कारखान्याचे कामकाज संस्थापक अध्यक्ष गोरे दादा यांनी केल्यामुळेर त्या विश्वासाच्या जोरावरच त्या भाग भांडवलावरच कारखान्याची वाटचाल चांगल्या पद्धतीने सर्वांच्या सहकार्याने चालू आहे.

कारखान्याकडे कुठलेच पक्षीय पाठबळ नसताना सर्वसामान्यांचा विश्वास हेच पाठबळ मानून कारखाना आजपर्यंत आलेल्या आव्हानाला सामोरा गेला आहे. बाहेरून पाणी न घेता उसातील पाण्यावर हा कारखाना चालवला गेला आहे

शेतकऱ्याची सोय होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीस्टेटची स्थापना होऊन पैशाची होणारी अडचण सोडविण्यात आली आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी आजपर्यंत कारखान्याच्या वाटचालीमध्ये मोलाचा सहभाग नोंदवून सहकार्य केले आहे.

आधुनिक युग हे तंत्रज्ञानाचे असल्याने कृत्रिम बुद्धिमत्ता चा प्रयोग ऊस शेतीमध्ये करण्यासाठी परिसरात शेतकऱ्याचे १० गट स्थापन केले आहेत.

जेणेकरून उसाचे उत्पादन अधिक वाढेल.

चालू हंगामामध्ये ऊस तोडी साठी ५० बैलगाडी, २५० मिनी ट्रॅक्टर, १५० मोठे ट्रक ट्रॅक्टर, ४४ हार्वेस्टर च्या साह्याने परिसरातील उसाची तोड होणार असल्याने आठ हजार गाळपाची प्रतिदिन क्षमता असणारी यंत्रणा सक्षम तयार असल्याचे सांगितले.

कारखाना सरासरी ६००० टन प्रति दिन क्षमतेने चालून एप्रिल अखेर परिसरातील सर्व उसाचे गाळप पूर्ण होईल असा विश्वास त्यांनी दिला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे असणारे रहीम सय्यद साहेब यांनी मनोगतामध्ये आस्वामी प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालणार असून त्या प्रमाणे सर्व नियोजन पूर्ण झाल्याचे सांगितले. कार्यकारी संचालक सूर्यकांत डाके साहेबांनी आमच्या हस्ते मोळी टाकली त्याबद्दल आणि गोरे दादांसारखे चेअरमन आज पर्यंत पाहिले नसल्याबाबत आवर्जून उल्लेख केला.

परिवारातल्यासारखे सर्वांना सोबत घेऊन चालणारे चेअरमन असा त्यांचा उल्लेख केला.

कारखान्यामधील सर्व मशिनरीचे काम वेळेत पूर्ण करून पूर्ण क्षमतेने हा कारखाना चालवण्यासाठी सर्व खाते प्रमुख, कर्मचारी सज्ज असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्याचे, कारखाना संचालक मंडळ, मल्टीस्टेट संचालक मंडळ, राजश्री शाहू ट्रस्ट चे विश्वस्त तसेच पत्रकार प्रशांत गुंडाळे, कारखान्याचे सर्व खाते प्रमुख, कर्मचारी,ऊसतोड वाहतूक ठेकेदार हितचिंतक या सर्वांचे कार्यक्रमासाठी उपस्थित राहिल्याबद्दल संचालक- वीं. निलेश पाटील यांनी आभार मानून

अध्यक्ष मोरे दादा यांच्या परवानगीने कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# गुंजोटीसह परिसरात रब्बी पेरणी सुरू



गुंजोटी (प्रतिनिधी)-पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावली. त्यानंतर मान्सूनही दमदार बरसला. अतिवृष्टी आणि पुराने खरीप जवळपास वायाच गेले. ते दु:ख बाजूला सारून आता वाफसा आल्याने शेतकरी रब्बी पेरणीच्या तयारीला लागला आहे. उमरगा तालुक्यातील गुंजोटीसह परिसरात रब्बी पेरणीला सुरुवातही झाली आहे. शेतकरी हरभरा, करडई, गहू, ज्वारीची पेरणी करत आहेत. उसाची लागवडही मोठ्या प्रमाणात होणार होण्याची शक्यता आहे. अतिवृष्टीमुळे यावर्षी रब्बी पेरणीस उशीर झाला आहे.

खरिपाची पिके रानात पाणी थांबल्यामुळे वाया गेली. रब्बी पेरणीला पाण्यामुळे पेरणी वेळेत करणे कठीण गेले. ऑक्टोबर महिन्यात रब्बी पेरणी पूर्ण केली जाते. मात्र यावर्षीच्या अतिवृष्टीमुळे नोव्हेंबर महिन्यात पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. अजूनही काही भागात वाफसा नसल्याने ज्वारीचा पेरा कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जास्तीच्या पावसामुळे गाजरगवत, झाडी-झुडपे मोठ्याप्रमाणात वाढली आहेत. पेरणीसाठी शेत तयार करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत आहेत. मजूर लवकर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अडून जास्तीची मजुरी मागितली जात आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. लवकर पेरणी व्हावी म्हणून बहुतांश शेतकरी ट्रॅक्टरवर पेरणीस प्राधान्य देत आहेत. अधिकच्या पावसामुळे शेत रस्त्यांची पुरती वाट लागली आहे. बी-बियाणे, खते शेताकडे घेऊन जाताना नादुरुस्त रस्त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत आहेत. कृषी विभागाकडून वरातीमागून घोडे म्हटल्याप्रमाणे शेतकऱ्यांना बी-बियाणे वेळेवर उपलब्ध केले जात नाहीत. बी-बियाणे वाटपाबाबत शेतकरी अद्यापही अनभिज्ञ कृषी विभागाकडून हरभरा, करडई, ज्वारी पिकाची बियाणे वाटप केले जातात. मात्र वाटप करताना शेतकऱ्यांना माहिती मिळत नाही. कोणामार्फत, कधी वाटप केले जाते. याचा थांगपत्ताही शेतकऱ्यांना लागत नाही. अगोदरच शेतकरी सर्व बाजूने संकटात आहे. पेरणीसाठी हेक्टरी १० हजार रुपयांची शासनाकडून आर्थिक मदत केली जाणार आहे. मात्र अद्यापही मदत शेतकऱ्यांना मिळाली नाही. नुकसान भरपाईची मदतही अजून काही शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली नाही. शासनाच्या मदतीवर विसंबून राहिल्यास आणखीन पेरणी लांबणीवर पडणार असल्याने शेतकऱ्यांनी पेरणी, बी- बियाणे, खतासाठी बँक, सोसायटी, सावकारकडे तजवीज करून चाड्यावर मूठ धरली आहे. यावर्षी पेरणीस उशीर झाल्याने उत्पन्नात घट होणार असल्याचे दिसत आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649